मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | बुधवार, ३० ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १३० | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## हिजबुल्लाच्या प्रमुखपदी नईम कासिम



**तेहरान :** इस्त्रायलच्या हल्ल्यात हसन नसराल्लाहच्या मृत्यूनंतर 32 दिवसांनी हिजबुल्लाने नवीन प्रमुखाची घोषणा केली आहे. उपनेते नईम कासिम यांच्याकडे मंगळवारी संघटनेची जबाबदारी सोपवण्यात आली. हिजबुल्लाहने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, "कासिम यांनी नेहमीच संघटनेच्या तत्त्वांचे पालन केल्यामुळे त्यांची या पदासाठी निवड करण्यात आली आहे. अल्लाह त्यांना त्यांच्या मिशनमध्ये यशस्वी होण्याचा मार्ग दाखवो." आतापर्यंत कासिम संघटनेत दुसऱ्या क्रमांकावर होता. नसराल्लाहच्या मृत्यूनंतर, कासिमनेच लेबनॉनच्या लोकांना संबोधित केले. यूएई मीडिया हाऊस इरेम न्यूजनुसार, तो इराणमध्ये राहतो.



गाझियाबादच्या न्यायालयात न्यायाधीश-वकील भिडले
पान 8

## म ह त्त्वा चे

### यंदाची निवडणूक गद्दार आणि निष्ठावंतांमधील



**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख असल्याने यावेळी अनेकांनी आपला अर्ज भरला. महाविकास आघाडीमध्ये अणुशक्तीनगर विधानसभेची जागा शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला सुटल्याने या मतदारसंघातून समाजवादी पक्षाच्या नेत्या आणि अभिनेत्री स्वरा भास्करचे पती फहाद अहमद यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे फहाद यांनीही मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत काँग्रेस नेते कन्हैया कुमार सुद्धा उपस्थित होते. यावेळी कन्हैया यांनी महाराष्ट्रातील यंदाची निवडणूक गद्दार आणि निष्ठावंत यांच्यामधील असल्याचा टोला लगावला आहे.

### संजय राऊत 'बीफ बिर्यानी' चाटून पुसून खातात!



**मुंबई :** एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांना ठाकरे सेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. संजय राऊत यांनी गोमांसयुक्त बिर्याणी खाल्ल्याचे इम्तियाज जलील यांनी एका पत्रकार परिषदेत जाहीरपणे म्हटले आहे. यासंदर्भातील एक व्हिडिओ सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल होतो आहे. त्यात जलील यांनी संजय राऊत यांची पोलखोल केल्याचे स्पष्ट दिसत आहे. इम्तियाज जलील म्हणाले की, "संजय राऊत यांनी अनेकदा गोमांसयुक्त बिर्याणी (बीफ की बिर्यानी) खाल्ली असून ते बंद दाराआड ती खात असतात. इतकंच नाही तर त्यांना गोमांसयुक्त कटलेटही (बीफ के कटलेट) हवे असतात. कुर्मा तर अगदी चाटून-पुसून खातात. परंतु राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी ते आपल्या बोलण्यातून त्याचा विरोध करत असतात." संजय राऊतांनी याबाबत अद्याप उत्तर दिलेले नाही किंवा आपली भूमिकाही मांडली नाही. त्यामुळे जलील यांच्या आरोपांवर त्यांची भूमिका काय याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### या वयात इतके खोटे बोलायचे नसते... फडणवीसांनी शरद पवारांना सुनावले

**मुंबई :** दिवंगत उद्योगपती रतन टाटा महाराष्ट्रात उद्योग आणणार होते. पण भाजपा आणि राज्य सरकारने हे उद्योग गुजरातमध्ये नेले, असा आरोप शरद पवारांनी केला होता. त्यांच्या या आरोपांमुळे आता राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उत आलेला आहे. असे असतानाचा भाजप नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांना खडेबोल सुनावले आहेत. त्यांनी थेट शरद पवार यांच्या वयावर भाष्य करत "या वयात इतके खोटे बोलायचे नसते..." असे म्हणत फडणवीसांनी आजपर्यंतच्या प्रकल्पांचा लेखाजोखा आपल्या सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून मांडला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांनी केलेल्या विधानाचा चांगलाच कार्यक्रम घेतला आहे.

# अजित पवारांनी नाहक आमचे सरकार पाडले



## माझ्या कार्यकाळात 70 हजार कोटींचा घोटाळा झाला नाही, पृथ्वीराज चव्हाण यांचा खुलासा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

सिंचन घोटाळा अजित पवारांची पाठ सोडत नाही, अशी मिश्किल टिप्पणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. माझ्या कार्यकाळात कधीही 70 हजार कोटींचा घोटाळा झाला नाही. माझ्या कार्यकाळात सिंचन खात्याला सिंचनाची श्वेतपत्रिका काढण्याचा आदेश देताना 70 हजार कोटींचा घोटाळा शब्द वापरला नव्हता, असेही ते म्हणाले. अजित पवारांनी माझे सरकार नाहक पाडले, असा दावाही पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

अजित पवार यांनी भाजपने आरोप केलेल्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीचे खापर तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्यावर फोडले आहे. त्यावेळी माझ्यावर झालेल्या आरोपाच्या चौकशीच्या फाईलवर आर. आर. आबांनी सही केली, असे अजित पवार यांनी म्हटले. त्यांच्या विधानावर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत.

**मी राज्याच्या जनतेच्या हिताच्या निर्णय घेतले, त्याची शिक्षा मी भोगली!**

*2014 ला अजित पवारांनी माझे सरकार पाडले. मी अजुनही ती फाईल बघितली नाही. ती फाईल गृहमंत्र्यांच्या स्तरावरुन मान्यता मिळून खाली गेली. त्यामुळे अजित पवार जे बोलले खरे आहे. मात्र, त्यात माझा काय दोष आहे, हे सांगितले असते बरे झाले असते. मी सिंचन प्रकरण, राज्य सहकारी बँकेचे प्रकरण असेल, मी राज्याच्या जनतेच्या हिताच्या निर्णय घेतले याची मला शिक्षा भोगली, पण मला त्याची चिंता नाही, असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.*

पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले, श्वेतपत्रिका म्हणजे चौकशी नाही. श्वेतपत्रिका याच्यासाठी की, अजित पवारांच्या 2010-11 आर्थिक पाहणी अहवालात 70 हजार कोटी रुपये खर्च झाले आणि सिंचनाची टक्केवारी 18.0 वरुन 18.1 झाली, हे अजित पवारांच्या नियोजन मंडळाच्या अहवालात नमूद केले होते. नव्याने मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर मी ते पाहिले असता, मला धक्का बसला. त्यामुळे नेमकी वस्तूस्थिती सांगण्यासाठी एक अहवाल सादर करण्यास सिंचन खात्याला सांगितले. पुन्हा चुका होऊ नयेत हा त्या मागचा हेतू होता. चौकशी करायची असती तर अँटी करप्शनकडे दिली असती, असे चव्हाण सांगितले.

या प्रकरणाची खुली चौकशी व्हावी, असा खालून एक अहवाला आला. त्यामध्ये अँटी करप्शनकडून चौकशी करण्याचे आदेश द्यावे, असे त्या अहवालात म्हटले होते आणि तो गृहमंत्र्यांना सादर केला गेला. तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी आपल्या स्तरावर ती मान्यता दिल्याचे मला आज अजित पवारांनी आज केलेल्या उल्लेखामुळे कळले, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. ती फाईल माझ्याकडे आली नाही. त्यावर माझी सही नाही. त्यामुळे 70 हजार कोटींच्या सिंचन घोटाळयात मी चौकशी लावली नव्हती. माझा नाहक बळी घेतला, असे ते म्हणाले.

# श्रीनिवास वनगा नॉट रिचेबल



## पालघरमध्ये खळबळ, पोलिसांकडून शोध सुरू

**प्रतिनिधी**
**पालघर**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी नाकारण्यात आल्याने नाराज झालेले पालघरचे आमदार श्रीनिवास वनगा हे 24 तासांपासून नॉट रिचेबल झाले आहेत. श्रीनिवास वनगा यांचे दोन्ही फोन बंद असून, त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत. त्यामुळे पालघरमध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, बेपत्ता असलेल्या श्रीनिवास वनगा यांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

2022 मध्ये एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत बंड झालं तेव्हा पालघरचे आमदार श्रीनिवास वनगा हे शिंदे सेनेत आले होते. दरम्यान, विधानसभा निवडणुकीसाठी एकनाथ शिंदे यांच्यासोबत आलेल्या जवळपास सर्वच आमदारांना शिंदे सेनेकडून पुन्हा संधी देण्यात आली. मात्र केवळ श्रीनिवास वनगा यांनाच उमेदवारी नाकारण्यात आली. काल त्यांच्याऐवजी राजेंद्र गावित यांना पालघरमधून उमेदवारी दिल्याचं स्पष्ट होताच श्रीनिवास वनगा यांना मोठा धक्का बसला होता. तसेच ढसाढसा रडत त्यांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली होती. 'तू मतदारसंघात निवडून येत नाही, तुझ्याबाबतीत नकारात्मक अहवाल आलाय हे कारण देऊन मला मागेही थांबवले, मी प्रामाणिकपणे थांबलो. प्रत्येक वेळी गावितांना तिकिट दिले. जेव्हा जेव्हा चांगली संधी येते, मी चांगले काम केले तरीही मला डावलण्यात आलं,असं सांगत आमदार श्रीनिवास वनगा ढसाढसा रडले होते.

### श्रीनिवास वनगा यांची काळजी वाटते



*सर्व घडामोडीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी ट्वीट केले आहे. श्रीनिवास वनगा यांनी पक्षाशी गद्दारी केली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा विश्वासघात केला. तरीसुद्धा ज्या बातम्या त्यांच्याबद्दल येत आहेत त्यावरून त्यांची निश्चितच काळजी वाटते, असे सांगतानाच सत्ताधाऱ्यांमध्ये क्रूर लोक बसले आहेत. वनगा यांनी अशा क्रूर लोकांसाठी आपल्या जीवाशी खेळू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.*

# पवारांच्या दोन उमेदवारांविरुद्ध शिंदेंनी चक्क हेलिकॉप्टरने पाठवले एबी फॉर्म

**प्रतिनिधी**
**नाशिक**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी आणि महायुती ताकदीने मैदानात उतरले आहेत. मात्र, दोन्ही आघाड्यांमध्ये अनेक जागांवर बिघाडी पाहायला मिळत आहे. महाविकास आघाडीकडून जवळपास 5 जागांवर दोन घटकांनी पक्षांनी उमेदवार दिलेले आहेत. तर दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दोन उमेदवारांविरुद्ध हेलिकॉप्टरने एबी फॉर्म पाठवले.

दिंडोरी विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादीने नरहरी झिरवाळ यांना उमेदवारी दिली आहे. तर देवळालीमधून सरोज अहिरे यांना अजित पवारांनी मैदानात उतरवले आहे. दरम्यान, नरहरी झिरवळ आणि सरोज अहिरे यांच्याविरोधात उमेदवार देण्यासाठी एकनाथ शिंदेंनी चॉपरने एबी फॉर्म पाठवले. शिंदेंच्या शिवसेनेने अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अखेरच्या क्षणी शिवसेनेने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. नांदगावमध्ये समीर भुजबळ आणि सुहास कांदे यांच्यातील वाद रंगत असताना नाशिकमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी खेळी केली आहे.

### शिंदेंचे 'हेलिकॉप्टर पॉलिटिक्स'

शिंदे यांच्या शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची वेळ संपण्याच्या एक तास अगोदर एबी घेऊन नाशिकमध्ये पोहोचले. दिंडोरीचे उमेदवार धनराज महाले आणि देवळालीच्या उमेदवार राजश्री अहिरराव यांच्यासाठी चॉपरने एबी फॉर्म पाठवण्यात आले.

# आर. आर. आबांनी केसाने गळा कापला

## सिंचन घोटाळ्यातील चौकशीवरुन अजित पवारांचा गौप्यस्फोट

**प्रतिनिधी**
**तासगाव**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे. भाजपने आरोप केलेल्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीचे खापर त्यांनी तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्यावर फोडले आहे. त्यावेळी माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. आणि चौकशीची करण्यासाठी फाईल तयार करण्यात आली. त्या फाईलवर आर. आर. आबांनी सही केली असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर हा केसाने गळा कापण्यासारखा प्रकार असल्याचेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आर. आर. पाटील यांच्याबाबत हा गौप्यस्फोट केला आहे. तासगावमध्ये आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. या वेळी अजित पवार म्हणाले की, माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. मला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. मात्र त्या फाईलवर आर. आर.



पाटलांनी सही केली असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता महाराष्ट्रात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

या वेळी अजित पवार म्हणाले की, इतक्या वर्षात केवळ बेचाळीस हजार कोटी रुपयांची कामे झाली होती. तरी माझ्यावर 70 हजार कोटींचा आरोप झाला. मात्र आकडा जेवढा मोठा आकडा, तितके लोक गंभीरतेने घेतात. म्हणून आकडा मोठा केला असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. या आरोपांमुळे माझ्या चौकशीची फाईल तयार झाली.

पान 8 वर

# पटोलेंनी तिकीटे विकली...

## काँग्रेसच्या माजी आमदाराचा धक्कादायक आरोप

**प्रतिनिधी**
**यवतमाळ**



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर तिकिटे विकल्याचा आरोप करत माजी आमदार विजय खडसे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमरखेड मतदारसंघातून विजय खडसे इच्छुक होते. मात्र याठिकाणी काँग्रेसनं साहेबराव कांबळे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे माजी आमदार नाराज झाले आहेत.

विजय खडसे यांनी म्हटलं की, मी पक्षाकडे तिकिट मागितले तेव्हा ज्याचं सर्व्हेत नाव येईल त्यांना उमेदवारी मिळेल असं नाना पटोलेंनी सांगितले, माझे नाव सर्व्हेत एक नंबरला असताना मला उमेदवारी नाकारण्यात आली. मला नाकारल्याचं दु:ख नाही परंतु या मतदारसंघात बाहेरचा उमेदवार पक्षाने दिला. स्थानिक उमेदवाराला डावलण्यात आले. जो उमेदवार पक्षाने दिला तो भ्रष्ट अधिकारी मोपलवार यांचा मानसपुत्र असलेल्या माणसाला दिली याची खंत आहे. बाहेरचा उमेदवार देण्यामागे काँग्रेसला संपवण्याचं षडयंत्र पटोलेंनी केलंय का, अशी शंका आहे. 21 इच्छुकांनी उमेदवारी मागितली, परंतु स्थानिकांना डावलून मुंबईत राहणाऱ्या मोपलवारचं काम करणाऱ्या माणसाला ही उमेदवारी देण्यात आली असा आरोप त्यांनी केला.

# काँग्रेसने तिकीट दिलं, पण एबी फॉर्मच दिला नाही

## दिलीप मानेंनी 'अपक्ष' भरला अर्ज

**सोलापूर**



सोलापूर काँग्रेसमध्ये चाललंय काय असा प्रश्न पडावा, असाच प्रकार घडला आहे. लोकसभा निवडणुकीआधी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून काँग्रेसमध्ये आलेल्या माजी आमदार दिलीप माने यांना विधानसभा निवडणुकीची उमदेवारी देण्यात आली. पण, त्यांना पक्षाकडून एबी फॉर्मच देण्यात आला नाही. त्यामुळे माने यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. त्यामुळे सोलापूर काँग्रेसमधील गटबाजीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेसमध्ये नाट्यमय घटनाक्रम घडला. दिलीप माने यांना काँग्रेसने उमेदवारी पान 8 वर

# पोलीस भाजपच्या राजकीय कामाला जुंपलेत

## रश्मी शुक्लांची बदली करण्याची संजय राऊतांची मागणी

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मालेगाव बाह्य मतदारसंघातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार अद्वय हिरे यांच्यावर शिंदे गटाचे उमेदवार मंत्री दादा भुसे यांच्या तीन गुंडांनी गावठी कट्ट्यातून हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या घटनेने खळबळ उडाली असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी तीव्र शब्दात प्रतिक्रिया दिली आहे. राज्याच्या पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला



यांची ताबडतोब बदली करावी आणि गुंडागर्दी, झुंडशाहीविरोधात कठोर कारवाईचे निर्देश द्यावेत, अशी मागणी राऊत यांनी देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना केली.

अद्वय हिरे यांच्यावर दादा भुसे यांच्या गुंडांनी हल्ला केला. त्यांच्याजवळ लोखंडी शिगा, तलवारी, गावठी कट्टे होते. हिरे यांना ठार मारण्याच्या उद्देशानेच हा हल्ला झाला. यात 5 शिवसैनिक जखमी झाले असून पोलिसांनी अजून कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. पोलीस यंत्रणेचा वापर करून अशा प्रकारे हल्ले होणार असतील तर त्यांना महाराष्ट्रात निवडणुका शांततेने करायच्या नाहीत हे दिसते. राज्याच्या पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला यांची निवडणुकीआधी पान 8 वर

# निवडणूक म्हणजे 'संगीत खुर्ची' आहे का?

### शायना एनसींना उमेदवारी मिळताच अतुल शहा यांचा पक्षाला संतप्त सवाल

**प्रतिनिधी**
**मुंबई**



भाजपच्या प्रवक्त्या शायना एनसींना मुंबादेवीतून शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. उमेदवारी मिळण्याच्या आधी त्यांनी औपचारिकपणे शिंदे सेनेत प्रवेश केला. मात्र त्यांच्या उमेदवारीला आता भाजपमधूनच विरोध होताना दिसत आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते अतुल शहा यांनी बंडाचे निशाण फडकवले असून त्यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला. शहा यांनी आपली व्यथा मांडली. तसेच निवडणूक म्हणजे संगीत खुर्चीचा खेळ आहे का? असा संतप्त प्रश्नही पक्षाला विचारला. यावेळी त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते.

शहा म्हणाले की, पान 8 वर

## पंतप्रधानांनी 51 हजार लोकांना दिली नोकरीची नियुक्ती पत्रे

# तुम्ही सेवक आहात, राज्यकर्ते नाही... गरीब आणि मागासलेल्यांची सेवा करा!

**नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी देशातील 40 ठिकाणी आयोजित रोजगार मेळाव्यात 51 हजार तरुणांना सामील होण्यासाठी पत्रांचे वाटप केले. लोकसभा निवडणुकीनंतर पंतप्रधान मोदींच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिलाच रोजगार मेळावा आहे.

ऑक्टोबर 2022 मध्ये मेळा सुरू झाला. आतापर्यंत 13 मेळ्यांमध्ये 8.50 लाखाहून अधिक तरुणांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. याआधी 12 फेब्रुवारी 2024 रोजी शेवटचा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये 1 लाखाहून अधिक लोकांना 'जॉइनिंग लेटर'चे वाटप करण्यात आले होते.

यावेळी पंतप्रधान मोदींनी नोकरीचे पत्र मिळालेल्या तरुणांना सांगितले की, तुम्ही राज्यकर्ते नसून जनतेचे सेवक आहात. त्यामुळे गरीब आणि मागासलेल्यांची सेवा करा. येत्या 25 वर्षात तुम्हीच विकसित भारत घडवाल. नवीन तंत्रज्ञान आणि नवीन परदेशी गुंतवणूक देशात आणण्यासाठी आम्ही एक योजना सुरू केली. मेक इन इंडिया मोहीम आणि पीएलआय योजनेमुळे रोजगार निर्मितीचा वेग अनेकपटींनी



वाढला आहे. प्रत्येक क्षेत्रातील उद्योगांना चालना मिळत आहे. तरुणांसाठी नवनवीन संधी निर्माण होत आहेत.

**लखपती दीदी**

आमच्या सरकारने या महिलांना 3 कोटी लखपती दीदी बनवण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आतापर्यंत सुमारे 1.25 कोटी महिला लखपती दीदी बनल्या आहेत. म्हणजे त्याचे वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. लखपती दीदी योजनेने ग्रामीण महिलांना रोजगार आणि स्वयंरोजगाराची नवीन साधने दिली आहेत. गेल्या दशकात 10 कोटी महिला बचत गटांमध्ये सामील झाल्या आहेत. याचा अर्थ 10 कोटी महिलांनी स्वयंरोजगारातून कमाई सुरू केली आहे.

**पंतप्रधान इंटर्नशिप**

आज भारतातील तरुणांच्या क्षमता वाढवण्यासाठी कौशल्य विकासावर भर दिला जात आहे. आम्ही स्किल इंडिया सारख्या मोहिमा सुरू केल्या आहेत. शेकडो कौशल्य विकास केंद्रांमध्ये तरुणांना प्रशिक्षण दिले जात आहे. अनुभवासाठी व संधीसाठी भटकावे लागू नये, अशीही व्यवस्था करण्यात आली आहे. पंतप्रधान इंटर्नशिप योजनेअंतर्गत 500 टॉप कंपन्यांमध्ये सशुल्क इंटर्नशिपची व्यवस्था करण्यात आली आहे. दरमहा ५ हजार रुपये दिले जातील. एक कोटी तरुणांना इंटर्नशिपची संधी दिली जाणार आहे.

# कासरगोडमध्ये स्फोट 150 जखमी, 8 गंभीर

**तिरुवनंतपुरम**

केरळमधील कासारगोड येथील अंजुतांबलम वीरकावू मंदिरात सोमवारी रात्री साडेबारा वाजता फटाक्यांच्या आतषबाजीदरम्यान स्फोट झाला. यामध्ये दीडशेहून अधिक जण जखमी झाले आहेत. कासरगोड पोलिसांनी सांगितले की, 8 जणांची प्रकृती चिंताजनक असून, त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या स्फोटाचे कारण समजू शकलेले नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, वार्षिक कालियाट्टम उत्सवासाठी 1500 लोक मंदिरात जमले होते. याठिकाणी फटाके फोडले जात होते, त्यामुळे ठिणग्या फटाक्यांच्या स्टोरेज एरियापर्यंत पोहोचल्या, जिथे आगीमुळे स्फोट झाला. या साठवणुकीच्या ठिकाणी 25 हजार रुपये किमतीचे फटाके ठेवण्यात आले होते. या अपघाताप्रकरणी पोलिसांनी मंदिर समितीच्या दोन सदस्यांना ताब्यात घेतले आहे. त्यांची चौकशी करण्यात येत आहे.

## घाटकोपर मध्ये महिला बचत गट वस्तूं विक्री प्रदर्शन

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घाटकोपर एन विभागातील नियोजन विभाग संचालक तसेच सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे यांच्या माध्यमातून दिवाळी सणासाठी महीला बचत गटांच्या विविध उत्पादित वस्तूंचे दोन दिवसीय विक्री आणि प्रदर्शन आयोजित करण्यात आले. मनपा समाज विकास अधिकारी साधना खाडे यांच्या देखरेखित संपन्न झालेल्या या दोन दिवसीय प्रदर्शनाला विभागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिला व बाल कल्याण योजना व राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत बचत गटांमार्फत उत्पादीत वस्तूंचे प्रदर्शन व विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. 25 ते 26 ऑक्टोबर या दोन दिवशी सकाळी 10 ते रात्री 9 वाजेपर्यंत घाटकोपर पूर्व रेल्वे स्थानकालगत नीलयोग मॉल समोर हे प्रदर्शन आयोजित केले होते. विभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास आवर्जुन भेट देऊन महिला बचत गटांना प्रोत्साहित केल्याची माहिती समाज विकास अधिकारी साधना खाडे यांनी दिली. या प्रदर्शनात महिला बचत गट मार्फत उत्पादित करण्यात आलेल्या विविध वस्तूंचे विक्री यावेळी करण्यात आली.



## थोडक्यात

### मोखाड्यातील बालिका हत्या प्रकरणी संशयीतास अटक

**मोखाडा:** मोखाड्यातील पिंपळाचापाडा येथे रविवारी 27 ऑक्टोबर ला 8 वर्षीय बालिकेवर अत्याचार करून हत्या केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या घटनेची गंभीर दखल घेत मोखाडा पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत, एका संशयीताला ताब्यात घेतले आहे.
त्याला भिवंडीच्या प्रथमवर्ग न्यायालयात हजर करण्यात आले असल्याची माहिती मोखाडा पोलिसांनी दिली आहे. मोखाडा नगरपंचायत क्षेत्रातील पिंपळाचापाडा येथील 8 वर्षीय बालिका, शेजारील मैत्रिणीच्या बहिणीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी गेली होती. ती रात्री उशिरापर्यंत घरी परतलीच नाही. त्यामूळे तीच्या पालक, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी तीचा शोध घेतला असता ती मुस्लीम बांधवांच्या दफनभुमी जवळ मिळून आली होती. प्रथमदर्शनी सदरच्या बालीकेवर अत्याचार करून नंतर तिची हत्या केल्याचे दिसून आले आहे. मृत बालीकेचे शवविच्छेदन नाशिक च्या जिल्हा शासकीय रुग्णालयात करण्यात आले आहे. तेथील शव विच्छेदन अहवाल अद्याप मोखाडा पोलिसांना प्राप्त झालेला नसल्याची माहिती मिळत आहे.

### दक्षिण मुंबईतील रस्त्यांची दुरुस्तीसाठी 9 कोटी खर्च करणार

**मुंबई:** दक्षिण मुंबईतील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती डागडुजीची कामे मुंबई महापालिकेने हाती घेतली आहेत. यामध्ये खचलेले रस्ते दुरुस्ती, खड्डे-चर भरणे, साइडपट्टी दुरुस्ती आदी कामे केली जाणार आहेत. दक्षिण मुंबईतील पाच विभागांच्या कामासाठी महापालिका नऊ कोटी खर्च करणार आहे.
दुरुस्तीचे काम करण्यापूर्वी आणि काम केल्यावर फोटो काढून ते पुरावे म्हणून कंत्राटदाराला सादर करणे बंधनकारक आहे.
महापालिकेच्या ए, बी, सी, डी, ई या पाच वॉर्डात म्हणजे सीएसएमटी, चर्चगेट, कुलाबा, मस्जिद बंदर, सँडहर्स्ट रोड, मरीन लाइन्स, ग्रँट रोड, भायखळा आदी भागांत पर्जन्य जलवाहिन्या, रस्ते, चौक आदी पाच ठिकाणी काम करण्यासाठी आचारसंहिता लागू होण्यापूर्वी कंत्राटदार नेमण्यासाठी महापालिकेने निविदा मागवली होती. त्याला पाच देकार प्राप्त झाले आहेत. जमिनीखालील जलवाहिनी फुटल्याने जमीन, रस्ता खचतो. कधी कधी पर्जन्य जलवाहिन्यांच्या ठिकाणी गटार, नाल्यांची भिंत कोसळते, तर कधी रस्त्यावरील, पदपथावरील ढापे तुटतात. अशा घटना यापूर्वी काळबादेवी, वांद्रे आदी ठिकाणी घडल्या आहेत. त्यामुळे महापालिकेकडून खचलेल्या रस्त्यांची दुरुस्ती केली जात आहे. महापालिकेने या पाच वॉर्डामधील कामांसाठी अंदाजित खर्च आठ कोटी ठरवला होता; पण कर आणि इतर आकार लक्षात घेता हा खर्च नऊ कोटींवर गेला आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## वसईत हायव्होल्टेज मुकाबला | आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यासमोर मोठे आव्हान

# माजी आमदार विवेक पंडितांच्या कन्या स्नेहा दुबे मैदानात; विजय पाटीलांचेही कडवे आव्हान

प्रतिनिधी
■ वसई







वसई विधानसभा मतदारसंघात यावेळेस बहुजन विकास आघाडीचा बालेकिल्ला हादरवण्यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीने फिल्डिंग लावली आहे. महाविकास आघाडी व महायुतीचे वसई विधानसभेतील लोकसभेतील यश लक्षात घेता यावेळेस बहुजन विकास आघाडीला वसई विधानसभा निवडणूक सोपी नक्कीच नाही. मी वसईचा पुढील आमदार असेन असे त्यांनी सांगितले असले, तरी वसई विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी स्वत: आमदार हितेंद्र ठाकूर यांना त्यांच्या राजकीय अनुभवाचा कस लावावा लागणार आहे. यावेळेस वसई विधानसभा क्षेत्रात वसईचे माजी आमदार विवेक पंडित यांच्या कन्या स्नेहा दुबे यांना रणांगणात उतरवण्यात आले आहे. तर महाविकास आघाडीकडून विजय पाटील हे बहुजन विकास आघाडीविरोधात रणांगणात आहेत. हा सामना नक्कीच हाय व्होल्टेज ठरणार यात शंका नाही.

बहुजन विकास आघाडीचे वसईत चांगले वर्चस्व आहे. मात्र बहुजन विकास आघाडीला यावेळेस लोकसभा निवडणूकीत मोठी पिछेहाट सोसावी लागली. तर याच राजकीय संधीचे सोने करण्यासाठी वसईचे माजी आमदार विवेक पंडित यांच्या कन्या स्नेहा दुबे यांना महायुतीने रणांगणात उतरवले आहे. स्नेहा दुबे यांचे पती नवीन दुबे यांचे वसईत चांगले राजकीय वर्चस्व आहे. तर एक काळ माजी आमदार विवेक पंडित यांनी गाजवला होता. महानगरपालिका तसेच पंचायत समिती व बहुतांश ग्रामपंचायतींवर त्यांच्या श्रमजीवी व वसई जनआंदोलन समितीचे राजकीय वर्चस्व होते. मात्र त्यानंतर त्यांच्या राजकीय कारकिर्दिला उतरती कला लागली. त्यात त्यांनीही राजकारणातून काढता पाय घेतला. त्यानंतर त्यांनउी बराचसा काळ श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून आदिवासी नागरिकांच्या न्यायहक्काच्या लढाईसाठी दिला. याच धर्तीवर आता त्यांच्या कन्येने स्नेहा दुबे यांनी वसईच्या रणांगणात दाखल झाल्याने विवेक पंडित यांना मानणारा वर्ग तसेच वसईच्या राजकारणात सध्या झालेली उलथापालथ यावर आता बहुजन विकास आघाडीचे राजकीय वर्चस्व अवलंबून असणार आहे.

अर्थात बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष व आमदार हितेंद्र ठाकूर हे अनुभवी राजकारणी आहेत. त्यांच्या अनुभवाचा आता या निवडणूकीत कस लागणार आहे. बहुजन विकास आघाडीचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यासमोर वसईचा गड राखणे हे यंदा आव्हानात्मक असून ते महायुती व महाविकास आघाडीच्या झंझावाताला कसे सामोरे जातात, काय रणनिती आखतात त्याकडे वसईकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

## पक्षांतरासाठी उतावळे नेते

# तिकीट मिळवण्यासाठी सत्तेच्या गल्ली-बोळांमध्ये चढाओढ

प्रतिनिधी
■ वसई

राजकारणातील निष्ठा हा शब्द आता फक्त सामान्य कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांपुरता उरला आहे. कारण नेत्यांच्या सतत बदलणाऱ्या पक्षनिष्ठेमुळे ही मूल्ये धूसर होत चालली आहेत.

तिकीट मिळवण्यासाठी नेते एक पक्ष सोडून दुसऱ्यात प्रवेश करत असल्याचे वारंवार चित्र पाहायला मिळत आहे. ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. पालघर जिल्ह्यातील प्रमुख नेते राजेंद्र गावित, विलास तरे, विजय पाटील यांची अशीच पक्षांतराची धावपळ सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनली आहे.

माजी आमदार विलास तरे यांनीही राजकारणात विविध पक्षांचा अनुभव घेतला आहे. प्रारंभी शिवसेना, मग बहुजन विकास आघाडी, नंतर पुन्हा शिवसेना, भाजप, आणि आता शिंदे गट असे पक्षांतराचे त्यांचे विविध टप्पे पाहायला मिळतात. त्यांच्या सततच्या बदलत्या भूमिकेमुळे त्यांचे कार्यकर्ते संभ्रमित झाले आहेत, आणि त्यांच्या पक्षनिष्ठेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

ज्या नेत्यांनी राजकीय तिकीट आणि अधिकारासाठी विविध पक्षांत प्रवेश केला, त्यांना जनता कोणत्या प्रकारे स्वीकारेल हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे. या नेत्यांच्या सतत बदलणाऱ्या पक्षांतरामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता आहे, आणि पक्षनिष्ठा हा प्रकार कागदोपत्रीच उरल्याची भावना व्यक्त होत आहे.

### *विजय पाटील- परतीचा प्रवास आणि काँग्रेसमधील स्थिरता*

*विजय पाटील यांनी बहुजन विकास आघाडीपासून काँग्रेस आणि शिवसेनेपर्यंत प्रवास केला आहे. त्यांनी गेल्या निवडणुकीत शिवसेनेतून लढवून आता पुन्हा काँग्रेसमधून वसई विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या परतीच्या प्रवासाने राजकीय वर्तुळात चर्चेचे वातावरण तापले आहे.*

### *राजेंद्र गावित – उमेदवारीसाठी पक्षांतराची दौड*

*पालघरचे माजी खासदार राजेंद्र गावित यांचे नाव पक्षांतराच्या बाबतीत विशेष चर्चेत आहे. त्यांच्या राजकीय प्रवासात काँग्रेस, भाजप, शिवसेना आणि पुन्हा शिंदे गट यांचा समावेश आहे. काँग्रेसमधून राजकीय कारकीर्द सुरू केलेल्या गावित यांनी भाजपात प्रवेश करून खासदारपद मिळवले; मात्र नंतर शिवसेनेत सामील होऊन आमदारही बनले. त्यानंतर शिवसेनेत फूट पडल्यानंतर ते शिंदे गटात गेले, परंतु येथेही तिकीट कापले गेल्याने ते पुन्हा भाजपात दाखल झाले. अशा सततच्या बदलांनी त्यांच्या पक्षनिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून सामान्य जनतेत नाराजी पसरली आहे.*



*मुंबई : मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील महानगरपालिका सचिव शुभांगी सावंत ३१ ऑक्टोंबर रोजी सेवानिवृत्त होत आहेत. काल त्यांना निरोप देण्याचा समारंभ आयोजित करण्यात होता.त्यावेळी सावंत यांनी महापालिकेला दिलेल्या सेवेबद्दल माजी नगरसेवकसचिन पडवळ , सुभाष डामरे मित्र मंडळाचे अध्यक्ष नाना फाटक व आनंद गांवकर यांच्या हस्ते त्यांना लालबागच्या राजाची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रफुल्ल गांवकर, नीलम मिरगळ, रुपेश कोचरेकर, राजू मोरे, अभिषेक गवाणकर उपस्थित होते.*

# दिवाळी बाजारपेठेची धामधूम; पण अरुंद रस्त्यांमुळे वाहतुकीची कोंडी

प्रतिनिधी
■ वसई

वसईत सध्या दिवाळी सणाचे आगमन होताच बाजारपेठांमध्ये सजावट, फटाके, कंदील, पणत्या, रांगोळीचे रंग यांची विक्री करण्यासाठी मोठ्या संख्येने दुकाने थाटली गेली आहेत. मुख्य रस्त्यांना खेटून अनियोजित पद्धतीने लावलेले हे स्टॉल्स आणि पदपथावरील विक्रेत्यांमुळे नागरिकांना चालण्यासाठीही जागा नसल्याचे चित्र दिसत आहे. अरुंद रस्त्यांमुळे वाहनचालकांना देखील अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे वाहतुकीची समस्या अधिकच बिकट झाली आहे.

दिवाळी खरेदीसाठी नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह असून, विशेषत: महिला वर्ग फराळाचे साहित्य, कंदील, लाईटिंग, फटाके, आणि रांगोळीच्या रंगांची खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी करत आहेत. सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याची विक्री करणारे स्टॉल्स रस्त्यावरच लावण्यात आल्याने नागरिकांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

वसईतील मुख्य रस्ते आधीच अरुंद असून, त्यात अनियोजित स्टॉल्स आणि विक्रेत्यांनी रस्ते व्यापले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागत आहेत. सार्वजनिक व्यवस्थेचा बोजवारा उडाल्यामुळे स्थानिकांनी पालिकेकडे विनंती केली आहे की, फेरीवाले आणि विक्रेते यांना पदपथ व मुख्य रस्त्यांवरून हटवून वाहतुकीसाठी मोकळ्या जागा उपलब्ध कराव्यात.

पालिकेने यावर तातडीने पावले उचलून नागरिकांना सुरळीत वाहतूक व चालण्यासाठी मोकळे रस्ते उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, अशी मागणी करण्यात येत आहे.

# वसईतील शेती आणि पर्यावरण संकटात

## बेकायदेशीर RMC प्लांटमुळे वाढता धोका; प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी
■ वसई

वसई ग्रामीण भागातील शेती आणि पर्यावरण सध्या गंभीर संकटात सापडले आहे. बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या RMC (रेडी मिक्स काँक्रीट) प्लांटमुळे येथील हिरवळ आणि शेतीला मोठा धोका निर्माण झाला आहे. परिसरातील शेतकरी आणि रहिवाशांनी या समस्येबद्दल प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत, मात्र अजूनही तहसीलदार किंवा संबंधित प्रशासनाने कोणतेही ठोस पाऊल उचललेले नाही.



या बेकायदेशीर प्लांटमुळे परिसरातील जमिनीचा पोत खराब होत असून पाण्याचे स्रोतही दूषित होत आहेत. रासायनिक पदार्थ आणि धुळीमुळे शेतकऱ्यांची शेती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्याचबरोबर वायूप्रदूषणही वाढत आहे, ज्यामुळे स्थानिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

शेतकरी आणि पर्यावरणप्रेमी यांच्याकडून वारंवार प्रशासनाकडे याबाबत कारवाईची मागणी करण्यात येत आहे. मात्र, तहसीलदार कार्यालयाकडून अजूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे स्थानिकांच्या मनात नाराजी पसरली आहे.

पर्यावरणाचे संरक्षण आणि शेतीचे नुकसान टाळण्यासाठी या बेकायदेशीर RMC प्लांटवर लवकरात लवकर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# कुलाब्यातील मतदान केंद्र स्थलांतरित न करण्याची ठाकरे शिवसेनेची मागणी

## केंद्र धार्मिक कारणावरून दूरवर हलवल्यास मतदानाची टक्केवारी घसरणार !

प्रतिनिधी
■ मुंबई

कुलाब्यातील मतदान केंद्र धार्मिक कारणावरून दूरवर हलवण्याची निवडणूक अधिकाऱ्यांमार्फत हालचाली सुरु झाल्यामुळे येथील मतदानाची टक्केवारी घसरण्याची शक्यता असल्याने हे मतदान केंद्र अन्य ठिकाणी स्थलांतरित करू नये अशी मागणी शिवसेना उबाठाने केली आहे.

कुलाबा मतदारसंघात एका धार्मिक सभागृहात असलेले मतदान केंद्र दूरवर हलवण्यात येत असल्याने स्थानिक मतदारांना नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. त्या केंद्राच्या अखत्यारीतील मतदानाची टक्केवारीही कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरहू मतदान केंद्र स्थलांतरित करू नये, अशी मागणी शिवसेना उबाठाने निवडणूक आयोगाकडे केली आहे. कुलाबा विधानसभेतील कांबेकर स्ट्रीट कच्छी मेमन जमातखाना हॉल येथील मतदान केंद्र क्रमांक ८४, ८५, ८६, ९३, १०५ व १०६ तसेच कांबेकर स्ट्रीट, हलाई मेनन खांडवाणी जमात हॉल येथील मतदान केंद्र क्र. ८९ व ९० ही मतदान केंद्रे धार्मिक सभागृहांमध्ये असल्यामुळे ती स्थलांतरीत करून दाणा बंदर, सुरत स्ट्रीट येथील बी.पी.टी. गोडाऊन येथे न्यावीत असा प्रस्ताव आहे.

नवीन जागी सुचविण्यात आलेली मतदान केंद्रे मतदारांच्या घरांपासून इतकी दूर आहेत की, वाहनाशिवाय तिथपर्यंत पोहोचता येणार नाही. रेल्वे लाईन ओलांडूनच मतदारांना तिथपर्यंत पोहोचावे लागेल. मतदारांनी जास्तीत जास्त प्रमाणात मतदान करावे असा निवडणूक आयोगाचा प्रयत्न असताना दूरवर मतदान केंद्र नेणे म्हणजे मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यासारखे आहे.

महाराष्ट्रात अनेक मतदान केंद्रे ही कोणत्या ना कोणत्या समाजाच्या, धर्माच्या कार्यालयात, सभागृहात किंवा शिक्षण केंद्रांत आहेत. कारण सर्वच ठिकाणी मतदारांच्या घराजवळ शासकीय जागा मतदान केंद्रासाठी उपलब्ध नसते. त्यामुळे कुलाब्यातील मतदान केंद्रे धार्मिक कारणामुळे स्थलांतरित करू नयेत, अशी विनंती शिवसेनेचे कुलाबा विधानसभा प्रमुख विकास मयेकर, उपविभागप्रमुख बाजीराव मालुसरे, शाखाप्रमुख मंगेश सावंत आणि समन्वयक दिलीप करंदीकर यांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली आहे.

**फिनट्री फायनांस प्रा. लि.**
**शाखा बंद करण्याची ग्राहकांना सूचना**

फिनट्री फायनांस प्रायव्हेट लिमिटेडमध्ये तुमच्या सहकार्यामुळे आम्ही तुमच्या आर्थिक गरजा पूर्ण करू शकलो. आमच्या कोल्हापूर, महाराष्ट्र शाखेचे (कार्यालय # एफ ०२, १ ला मजला, महालक्ष्मी सेंटर, व्यापारी पेठ, शाहूपुरी, कोल्हापूर ४१६००१) सोबत संबंध असलेल्या आमच्या मौल्यवान ग्राहकांना कळविण्यात येत आहे की सदर शाखा १ ऑक्टोबर २०२४ पासून बंद करण्यात आली आहे.
सदर शाखेमधील सर्व खात्ती आमच्या दुसऱ्या शाखेमधून हाताळण्यात येतील आणि तुमची सर्व खाती ह्या शाखेमध्ये ऑटोमॅटिक पद्धतीने हस्तांतरीत करण्यात येतील आणि तुम्हाला सदर शाखेकडून पूर्वीच्याच सेवा प्राप्त होऊ शकतील. आणि सदर शाखेसाठी संपर्क तपशील खालील प्रमाणे आहे

| राज्य | कार्यालय पत्ता | संपर्क क्र. | |
|---|---|---|---|
| मुंबई महाराष्ट्र | ४ था मजला, इंजिनियरिंग सेंटर, ओपेरा हाऊस, मॅथ्यु रोड, चर्नी रोड पूर्व, मुंबई – ४०० ००४ | संपर्क क्र. ७९७७८९२४६ | ई-मेल आयडी wecare@fintreefinance.com |

आमच्यासोबत तुमचे व्यवहार आणि विश्वास कायम असल्याचा आम्हाला अभिमान ज्यामुळे आम्ही देखील तुम्हाला भविष्यामध्ये अधिक चांगल्या आर्थिक सुविधा देऊ.
**फिनट्री फायनांस प्रा. लि.**
**नोंदणीकृत कार्यालय: ४ था मजला, इंजिनियरिंग सेंटर, ओपेरा हाऊस, मॅथ्यु रोड, चर्नी रोड पूर्व, मुंबई – ४०० ००४,**
**सीआयएन क्र: यू६५९२३एमएच२०१५पीटीसी२६४९९७**

# ज्योती गायकवाड यांनी धारावीतून उमेदवारी अर्ज केला दाखल

प्रतिनिधी
■ मुंबई

आपली घरे आणि व्यवसाय वाचवण्याच्या वाढत्या चिंतांच्या आणि वाढत्या भावनांच्या पार्श्वभूमीवर, गेल्या काही काळापासून चर्चेत असलेल्या धारावी या मतदारसंघातून महा विकास आघाडीचे (एमव्हीए) उमेदवार म्हणून ज्योती गायकवाड यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्याने हजारो धारावीकर त्यांच्याबरोबर सामील होण्यासाठी जमले.



उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी, ज्योती अनेक महिन्यांपासून या भागात प्रचार करत आहे आणि तिच्या लढ्याचा मुख्य आधार म्हणून धारावीचा पुनर्विकास आणि संविधानाचे संरक्षण करून तिला लोकांचा मोठा पाठिंबा मिळाला आहे. 'धारावी वाचवा, संविधान वाचवा' हे तिचे लक्ष केंद्रित राहिले आहे आणि तेच तिने आपले अर्ज दाखल केल्यानंतर मांडले.

ज्योतीने घरी तिच्या आईकडून आशीर्वाद घेऊन, कुटुंब आणि समाजाप्रती असलेल्या तिच्या बांधिलकीचे प्रतीक म्हणून दिवसाची सुरुवात केली. तिने तिच्या वर्षा गायकवाडाने बांधलेला संविधान रक्षक बँड परिधान केला होता, जो राज्यघटनेची मूल्ये कायम ठेवण्याच्या आणि प्रत्येक धारावीकरच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या तिच्या प्रतिज्ञेला सूचित करतो. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली वाहिली.

प्रचंड गर्दीसह गायकवाडांनी धारावीच्या रस्त्यांवरून मोर्चाचे नेतृत्व केले, त्यांना प्रत्येक वळणावर पाठिंबा आणि उत्साह मिळाला. ही रॅली समाजातील एकजुटीच्या सखोल भावनेचे प्रतिनिधित्व करते, सर्व स्तरातील रहिवासी त्यांची घरे आणि त्यांचे भविष्य जतन करण्याच्या सामायिक ध्येयासाठी एकत्र येतात.

178 व्या धारावी विधानसभेसाठी काँग्रेस पक्ष आणि महाविकास अघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून संविधानाच्या साक्षीने, धाराविकरांच्या आशीर्वादाने आणि काँग्रेस आणि भारत-महाविकास अघाडीचे वरिष्ठ आणि सहकाऱ्यांच्या उपस्थितीत आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

"आज, माझ्या आयुष्यातील या महत्त्वाच्या दिवशी, मी देवाचे सर्व दरवाजे ठोठावले आणि माझ्या धारावी कुटुंबाच्या कल्याणासाठी आणि राज्यघटनेच्या संरक्षणासाठी प्रार्थना केली. शेवटी हे संविधानच आहे, ज्यामुळे आपल्याला आपल्या इच्छेनुसार देवाची उपासना करण्याचा अधिकार आहे ", असे त्या म्हणाल्या. महाराष्ट्रात 20 नोव्हेंबर रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार असून 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that my client **MRS. PRAMILA RODRIGUES** wife of **Late MR.NELSON BENTO RODRIGUES** being the owner of a flat as defined herein below by registered Agreements for Sale of **Flat No.304** vide Chapil No.**1163/1995,** dated **31/05/1995** made between **M/S. UNITECH LIMITED & MR. NELSON BENTO RODRIGUES** in **"JHELUM WEST END CHS. LTD."** registered No. TNA (VSI)/ HSG/(TC)/9916/98-99. My clients husband **MR. NELSON BENTO RODRIGUES** has died intestate on **26/12/2013** at Dubai and has left behind **MRS.PRAMILA RODRIGUES (WIFE), NISHEL SAMANTHA RODRIGUES (Daughter), MR.RICARDO AMALINO RODRIGUES (SON)** only legal heirs.

Any person other than the above defined therefore, having any claim, right, title, interest, charge, lien, right of maintenance and/or any other right, whatsoever, on and in the said Flat, shall inform and send his/her objection/s, if any, in oral/writing to me along with all documentary proofs, within fifteen (15) days, from the date of publication of this notice. That falling which, it shall be presumed that my client is true.

That after the expiry of the Notice Period as above, we shall declare my client as the only owner of the said Flat and have full right to transfer on my client name and sale of the flat to any third party and that no any claim, right, title, interest etc. of whatsoever nature of any person/s shall be entertained thereafter.

**SCHEDULE OF THE SAID FLATS**

**Flat No. 304**, on the **THIRD Floor**, admeasuring **583 Square feet Built up area** or equivalent to 461.67 sq. ft. carpet area , in the building known as **"JHELUM WEST END CHS. LTD.", Building No. 17 of Type "B",** constructed on N.A.Land, bearing **Survey No. 316-B** lying being and situate at village **BOLINJ,** Taluka Vasai, District Palghar, within the area of sub-Registrar at Vasai No.II (Virar).

**Sign/-**
**Adv. Mayur P.Ajinkya**
**Mo.7499987574**
**Date:- 30.10.2024**

**NOTICE**

This is to notify that Mr. Mohd Afzal Ansari, & Late Parween Bano Mohammad Afzal Ansari are the Owners of the Unit No. 403, on 4th floor, admeasuring 28.44 sq. meters. (Carpet Area), in the Building 6, in the Project known as "Sunteck Maxx World-1" constructed on land bearing Survey No. 54, Hissa No. 4/1, 4/2, 6, 7/2, Survey No. 55. Hissa No. 2, 3, 4, 5A, Survey No. 56. Hissa No. 1/2, 2,3, at Village Tivri, Taluka Vasai, District Palghar. Whereas by Agreement for Sale dated 15/06/2020 (Registration No. Vasai3-5404/2020) 1) Mr. Mohd Afzal Ansari, 2) Mrs. Parween Bano Mohammad Afzal Ansari had purchased said Unit from Sunteck Realty Ltd., through its Authorized Signatory Rameshwari Rumpure. Said Mrs. Parween Bano Mohammad Afzal Ansari, Wife of Mr. Mohd Afzal Ansari, the Co-owner has died on 19/03/2023 leaving behind her i) Mr. Mohd Afzal Ansari, ii) Master. Suhel Afzal Ansari, iii) Miss. Alisha Hayat Ansari, iv) Master. Arman Afzal Ansari, being the legal heirs according to Indian Succession Act by which she was governed at the time of her death. As such i) Mr. Mohd Afzal Ansari, ii) Master. Suhel Afzal Ansari, iii) Miss. Alisha Hayat Ansari, iv) Master. Arman Afzal Ansari, each having 1/4th share in the undivided share of deceased Late. Mrs. Parween Bano Mohammad Afzal Ansari.Therefore any person/institution/Bank has possession, and/or has any right, title, interest or demand of any nature whatsoever into or upon or in respect of the said Property or any part thereof by way of any agreement, arrangement, sale, transfer, exchange, assignment, mortgage, gift, trust, lease, tenancy, leave and license, inheritance, lien, charge, easement, possession, pending litigation or any other right of whatsoever nature ishereby required to intimate the same along with the supporting documentsto the undersigned in writing at 203, Ali Plaza, Vartak Road, Virar (West), Taluka Vasai, District Palghar, within 14 days from the date of publication of this notice, failing which, all such rights, claims and/or demands, if any, to the said Property shall be deemed to have been waived and/or abandoned or given up or not existing.

Date: 30-10-2024
(MRS. KALPANA S. MHATRE)
ADVOCATE

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 130**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १३०**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई : महापालिकेतील प्रमुख अभियंता घकव्य व उप आयुक्त पर्यावरण व वातावरणीय बदल प्रशांत कृष्णा तायशेटे हे 58 वर्ष वयाची नियमित वयोमान सेवा करून सेवानिवृत्त होत आहेत त्यांनी वयाची 34 वर्ष महानगरपालिकेला व जनतेला अहोरात्र सेवा दिली. त्याबद्दल म्यूनिसिपल कर्मचारी कामगार सेना संघटनेच्या वतीने सर सरचिटणीस सत्यवान जावकर तसेच चिटणीस संजय वाघ कार्यकारी अभियंता परिवहन पश्चिम उपनगरे या खात्यातील स्थानिक पदाधिकारी राजेश इंदुलकर, महेंद्र चारनिया, सत्यम सावंत, जितेंद्र मारू, अरविंद वाघेला, अभिषेक रामाने हे या क्षणी उपस्थित राहून पुढील भविष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.*



# यामिनी जाधव, रईस शेखनंतर बीएमसीचे 16 नगरसेवक विधानसभेच्या रिंगणात

## ठाकरे शिवसेनेने सर्वाधिक ८ नगरसेवकांना उतरवले आखाड्यात

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मंगळवार शेवटची तारीख होती. महायुती आणि महाविकास आघाडी यांनी बहुतेक सर्व उमेदवारांची घोषणा केली आहे. मुंबईमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीसोबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी, परिवर्तन महाशक्ती, समाजवादी पार्टी, एआयएमआयएम या आणि अनेक पक्षांनी उमेदवारांची घोषणा केली आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिकेचे १६ माजी नगरसेवक आमदार होण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

महायुती आणि महाविकास आघाडीने सर्वाधिक २८८ उमेदवार मैदानात उतरवले आहेत. त्यांचा जागा वाटपाचा तिढा अजुनही सुटलेला नाही. अनेक मतदारसंघात बंडखोरीचे संकेत मिळत आहेत. मात्र अधिकृत उमेदवारांची घोषणा झाली आहे. त्यामध्ये आतापर्यंत मुंबई महापालिकेच्या १६ माजी नगरसेवकांना विविध पक्षांनी उमेदवारी दिली आहे. यामध्ये शिवसेना शिंदे गटाने ०२ , भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांनी प्रत्येकी एका माजी नगरसेवकाला उमेदवारी



दिली आहे. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने तीन आणि ठाकरे शिवसेनेने सर्वाधिक ८ माजी नगरसेवकांना तिकीट दिले आहे.

महायुतीने तीन माजी नगरसेवकांना विधानसभेचे तिकीट दिले आहे. यामध्ये मुरजी पटेल, सुवर्णा करंजे यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली, तर विनोद शेलार यांना भाजपकडून रिंगणात उतरवण्यात आले आहे. काँग्रेसने आसिफ झकेरिया, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने राखी जाधव यांना उमेदवारी दिली आहे. या दोन माजी नगरसेवकांसह महाविकास आघाडीचे १० माजी नगरसेवक मैदानात असणार आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना यंदा मोठ्या जोशात विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. त्यांनी संदीप देशपांडे, स्नेहल जाधव आणि भालचंद्र आंबुरे या माजी नगरसेवकांना तिकीट दिले आहे. यातील किती नगरसेवक आमदार होतात हे नोव्हेंबर २३ रोजीच कळणार आहे.

**ठाकरे सेनेचे ८ नगरसेवक रिंगणात**

*शिवसेनेचा जन्म हा मुंबईतील आहे. गेली २५ वर्षे मुंबई महापालिकेवर शिवसेनेची सत्ता होती. शिवसेनेत २०२२ साली झालेल्या बंडखोरीनंतरही अनेक नगरसेवक हे शिवसेना उद्धव ठाकरेंसोबत कायम राहिले. यातीलच ८ नगरसेवकांना आता आमदारकीचे तिकीट मिळाले आहे. यामध्ये श्रद्धा जाधव, मनोज जामसुतकर, प्रविणा मोरजकर, संदीप नाईक, समीर देसाई, बाळा नर, उदेश पाटेकर, संजय भालेराव यांचा समावेश आहे.*

# दीपावलीचा मंगलमय सण सुरक्षितरित्या साजरा करावा!

## मुंबई अग्निशमन दलाचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

दीपावलीचा मंगलमय सण साजरा करताना नागरिकांनी योग्य दक्षता बाळगावी. विशेषतः फटाके फोडताना लहान मुलांची अधिक काळजी घ्यावी. फटाके फोडण्याची वेळ रात्री १०.०० वाजेपर्यंत मर्यादित ठेवावी. आग अथवा तत्सम प्रसंग उद्भवल्यास तात्काळ क्रमांक १०१ किंवा नागरी मदत सेवा संपर्क क्रमांक १९१६ यावर संपर्क साधावा, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाकडून करण्यात आले आहे.

दरवर्षी अतिशय उत्साहात आपण सारेजण दीपावली सण साजरा करतो. या मंगलमय प्रसंगी दीपोत्सव साजरा करीत असतांना फटाक्यांची आतषबाजी, दिव्यांची सजावट तसेच विद्युत रोशणाई केली जाते. काही वेळा उत्साहाच्या भरात नकळत आगीच्या दुर्घटनांना निमंत्रण दिले जाते. त्यामुळे आगीच्या दुर्घटना वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा प्रकारच्या दुर्घटनांचे प्रमाण कमी करण्याकरीता योग्य काळजी घेतल्यास दीपावली सणाचा आनंद नक्कीच द्विगुणीत होईल. दीपावली सणामध्ये फटाके फोडण्याची वेळ रात्री १०.०० वाजेपर्यंत मर्यादित ठेवावी. या सूचनांचे सर्व मुंबईकरांनी पालन करावे, तसेच कमीत कमी वायू व ध्वनी प्रदूषण करणारे फटाके फोडावेत, असे आवाहन ही करण्यात आले आहे.

सर्व नागरिकांनी या आवाहनाला प्रतिसाद द्यावा. दीपावलीचा सण हा सर्वांसाठी आनंददायी, सुरक्षित व पर्यावरणपूरकरितीने साजरा करणे हे सामाजिक हिताचे आहे, अशी मुंबई अग्निशमन दलाकडून नम्र विनंती करण्यात आली आहे.

**फटाके फोडताना घ्यावयाची काळजी**

*१. फटाके फोडताना सुती कपडे परिधान करावेत.*
*२. फटाके मुलांपासून लांब ठेवावेत व फोडतांना मोठ्या व्यक्तिंनी सोबत रहावे.*
*३. फटाके फोडताना नेहमी पादत्राणे वापरावीत.*
*४. फटाके लावताना पाण्याने भरलेली बादली जवळ ठेवावी व भाजल्यास तात्काळ त्या ठिकाणी भरपूर स्वच्छ पाणी ओतावे.*
*५. फटाके फोडण्यासाठी अगरबत्ती व फुलबाजाचा वापर करावा.*

**फटाके फोडताना पुढील बाबी टाळाव्यात**

*१. इमारतीच्या आत व जिन्यावर फटाके फोडू नयेत.*
*२. फटाके पेटवण्यासाठी आगकाडी अथवा लायटरचा वापर टाळावा.*
*३. झाडे, ओव्हरहेड विद्युत तार किंवा उंच इमारतीजवळ हवेत उडणारे फटाके फोडू नयेत.*
*४. खिडक्यांच्या पडद्याजवळ पणत्या / दिवे लावू नयेत.*
*५. विजेच्या तारा, गॅस पाईपलाईन किंवा वाहनतळाच्या ठिकाणी फटाके फोडू नयेत.*
*६. घर, इमारत, परिसर इत्यादी ठिकाणी विद्युत रोशणाई करताना अधिकृत विद्युत तंत्रज्ञांची मदत घ्यावी. तसेच निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक क्षमतेचे विद्युत भार (ओव्हरलोड) होणार नाही, याची काळजी घ्यावी.*

# दिवाळीच्या सणात मुंबईतील आशांची पणती कोरडीच

## पालिका मुख्यालयावर केले आंदोलन




■ मुंबई

मंगळवारी २९ ऑक्टोबर रोजी दिवाळी बोनस आणि इतर महत्त्वाच्या प्रश्नांसाठी सीएसटी समोरच्या बीएमसीच्या मुख्य गेटवर आशा वर्कर्सनी आंदोलन केले. बीएमसी च्या सर्व कर्मचाऱ्यांना या वर्षी भरघोस बोनस जाहीर करण्यात आलेला आहे इतकेच नव्हे तर आरोग्य सेविकांना देखील बोनस/सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. मात्र गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने मागणी करूनही या वर्षी देखील आशांना बोनस देण्यात आलेला नाही. याचा निषेध करण्यासाठी NHM व BMC आशांनी हातात कोरडी पणती घेऊन आंदोलन केले. बोनस न मिळाल्याने व वाढत्या महागाईमुळे यंदा आशांची दिवाळी अंधारात जाणार आहे. या वेळी बीएमसीच्या असंवेदनशीलतेचा निषेध व्यक्त करण्यात आला. करोना महामारीत जीवाची बाजी लावून काम करणाऱ्या आशा वर्कर्स बद्दल बीएमसीच्या या भेदभावपूर्ण वागणुकीच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. हे आंदोलन आरमायटी इराणी, संगीता कांबळे, आरती कांबळे, मृणाल जंगम, अदिती तटकरे, सारिका इंगळे इत्यादी पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

# शिवाजीनगर मतदारसंघातून नवाब मलिकांच्या उमेदवारीचा सस्पेंस संपला

## मलिक राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार, हजारो समर्थकांसह भरला अर्ज

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवाजीनगर विधानसभेतून नवाब मलिकांच्या निवडणूक लढण्याचा सस्पेंस अखेर संपला आहे. मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी नवाब मलिक यांनी राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार म्हणून अर्ज दाखल करून सस्पेन्स संपवला आहे. महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांनी हजारो समर्थकांसह रोड शो करत मुंबईच्या शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दाखल करून आपली ताकद दाखवून दिली आहे. या भव्य रोड शोमध्ये सर्व जातीधर्मातील लोक सहभागी झाले होते.

नवाब मलिक यापूर्वी अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघातून आमदार राहिले आहेत. यावेळी ते मानखुर्द-शिवाजी नगर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. नवाब मलिक यांनी आधीच निवडणूक



लढवण्याची घोषणा केली होती, मात्र ते कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवणार यावरचा पडदा उठणे बाकी होते. कारण ते राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडणूक लढवणार की अपक्ष म्हणून की अन्य कोणत्या निवडणूक चिन्हावर ही उत्सुकता बाकी होती. मात्र शेवटी भाजपचा विरोध झुगारून त्यांना अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून ए,बी फॉर्म मिळाला आणि अखेर नवाब मलिक यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार म्हणून अर्ज दाखल करून हा सस्पेंस संपवला आहे.

नवाब मलिक यांनी सांगितले की ही निवडणूक आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून गेल्या १५ वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असलेल्या शिवाजीनगर परिसराचा मला विकास करायचा आहे. मलिक पुढे म्हणाले की, मी स्थानिक मुद्द्यांवर निवडणूक लढवत असून त्यात गोवंडी शिवाजीनगर अंमली पदार्थमुक्त करणे, शिक्षण व महिला सुरक्षेवर काम करणे, गोवंडी स्वच्छ व स्वच्छ करणे हे महत्त्वाचे आहे.

# राजावाडी पुनर्विकास खर्च 50 टक्क्यांनी फुगवल्याचा आरोप

## कंत्राट रद्द करण्याची काँग्रेसच्या माजी नगरसेवकांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेच्या राजावाडी रुग्णालयाच्या पुनर्विकासासाठी काढण्यात आलेली निविदा ही विशिष्ट ठेकेदाराला काम देण्यासाठी तयार करण्यात आली होती. त्याचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी वादग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली. तसेच पालिकेच्या नेहमीच्या दरांच्या एकत्रित अनुसूची ( युनिफाईड शेड्युल ऑफ रेटस् ) पद्धतीचा अवलंब न करता ईपीसी पद्धतीने दर काढल्याने या प्रकल्पाच्या खर्चात ५० टक्क्यांहून अधिक वाढ होऊन तो ४५५ कोटींपर्यंत पोहोचला, असा आरोप काँग्रेसच्या तीन माजी नगरसेवकांनी केला आहे.

या कंत्राटाच्या संभाव्य साटेलोट्यांबाबत इशारा दिल्यानंतरही पालिकेने निविदा प्रक्रिया थांबविली नाही. आता हा ठेका रद्द होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे काँग्रेसचे माजी नगरसेवक अश्रफ आझमी, मोहसिन हैदर आणि शीतल म्हात्रे यांनी म्हटले आहे. खासदार वर्षा एकनाथ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आमचा लढा सुरू राहील, न्यायालयात सुद्धा आम्ही जाऊ, असे त्यांनी सांगितले.

आझमी म्हणाले की, आम्ही ९ जुलै २०२४ रोजी याबाबत पालिकेला इशारा दिला होता. २३ सप्टेंबर २०२४ रोजी निविदा उघडल्यावर आमचा कयास खरा ठरला. शिवाय प्रकल्प सल्लागार म्हणून ज्यांची निवड झाली, त्या कंपनीला पुणे महानगरपालिकेच्या निविदा प्रकरणात खर्चाचे अंदाज फुगविल्याबद्दल देशाच्या स्पर्धा आयोगाने एक कोटी ३३ लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. त्यानंतर प्रकल्प रद्द करण्यात आला होता. या सल्लागाराचा इतिहास हा खर्च वाढवण्याचा आहे आणि पारदर्शकतेचा अभाव आहे.

आझमी यांनी प्रकल्पावर अनेक आक्षेप घेतले आहे.रुग्णालयीन प्रकल्पांमध्ये दीर्घकालीन देखभालीचा समावेश असतो, परंतु या प्रकल्पात फक्त तीन वर्षांची हमी आहे., निविदेमध्ये जैव वैद्यकीय कचऱ्याचे ऑन-साइट क्रशिंग अनिवार्य केले आहे, जे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करते., उपठेकेदारांना बंदी घालण्यात आली आहे, पण विशेष कार्यांसाठी प्रमाणित व्यावसायिकांची आवश्यकता असते.

# चांदिवलीतील महायुतीचे उमेदवार दिलीप लांडे यांनी निवडणूक अर्ज भरला

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 चांदिवली विधानसभा क्षेत्रातील शिवसेना भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस आरपीआय महायुतीचे अधिकृत लोकप्रिय, उमेदवार आमदार दिलीप मामा लांडे यांनी मंगळवारी आपला निवडणूक अर्ज भरला आहे. यावेळी नामांकन



भरताना उमेदवार दिलीप लांडे यांच्यासह विधानसभा प्रमुख अशोक माटेकर, माजी नगरसेविका शैला दिलीप लांडे, माजी नगरसेवक किरण लांडगे, वाजिद कुरेशी हरीश भांदीर्गे, दीपक बाबा हांडे

भाजपा जिल्हाध्यक्ष सुषम सावंत, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेंद्र सिंह, आरपीआयचे दादू कांबळे आदीसहित अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान निवडणूक अर्ज भरण्यासाठी जाताना आमदार दिलीप लांडे यांची काजूपाडा शिवाजी विद्यालय मैदान येथून विद्याविहार निवडणूक केंद्र पर्यंत वाजत गाजत फुल उधळत भव्य रॅली निघाली होती या रॅलीत सर्व जातीधार्माचे हजारो महिला पुरुष आणि तरुण कार्यकर्ते सहभागी झाले होते. यनिमित्ताने मोठी जनशक्ती प्रदर्शन करण्यात आले होते उपस्थित लोकांचा जोश मोठा होता महायुती आणि दिलीप लांडे यांच्या विजयाची घोषणा देत रॅली पुढे जात होती.



*मुंबई :नित्यानंद गॅरेज घाटकोपर मधील कामगार, कर्मचाऱ्यांचे ज्वलंत प्रश्नांवर म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे वतीने प्रशासनाबरोबर चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्यास प्रशासनास भाग पाडले. त्यामुळे सर्व कामगार, कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहित वातावरण तयार झाले. युनियनचे अध्यक्ष बाबा कदम यांनी प्रत्यक्ष भेटून त्यांचा यथोचित्त कामगारांच्या वतीने सत्कार केला. त्यावेळी प्रविण कल्याणकर, तानाजी जाधव, सचिन कांबळे, दत्ताराम लेंगरे, दत्ता सुर्वे, काशिनाथ मिसाळ हे उपस्थित होते.*




मुंबई :रिपब्लिकन पक्ष भाजप शिवसेना महायुतीचे कालिना मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार अमरजीत सिंह यांचा उमेदवारी नामांकन अर्ज मंगळवारी दाखल केला.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले हे आवर्जून उपस्थित राहिले. रिपब्लिकन पक्षासह महायुतीचे प्रमुख कार्यकर्ते,नेते याप्रसंगी उपस्थित होते.



*मुंबई :158 जोगेश्वरी विधानसभा क्षेत्राच्या महायुतीतील शिवसेना पक्षाच्या उमेदवार मनिषा रविंद्र वायकर यांनी इस्माईल युसूफ महाविद्यालयात आज आपला उमेदवारी अर्ज भरला. यावेळी त्यांच्यासोबत मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर, शिवसेनेचे जेष्ठ नेते व माजी खासदार गजानन कीर्तिकर, ओमप्रकाश तिवारी, निरीक्षक (भाजपा), उत्तर पश्चिम जिल्हा भाजपा अध्यक्ष संतोष मेढेकर, रचना सावंत उपस्थित होत्या*



*मुंबई :शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उमेदवार माजी नगरसेवक राजेंद्र वाघमारे यांनी 171 मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा निवडणूक कार्यालयामध्ये उमेदवारी अर्ज भरला*

# दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेला मिळाले तीन पुरस्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या 'दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँके'स लखनऊ येथील 'बॅंकींग फ्रंटिअर्स' या नामांकित संस्थेने विविध तीन वर्गवारीत पुरस्कार देवून गौरविले आहे. बेस्ट ऑडिट इनिशिएटिव्ह, बेस्ट सायबर सिक्युरिटी इनिशिएटिव्ह व बेस्ट एच.आर. इनोव्हेशन या तीन वर्गवारीत पुरस्कार पटकावित दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेने आपल्या शिरपेचात आणखी एक तुरा खोवला आहे.

'बँकींग फ्रंटिअर्स' या संस्थेतर्फे लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे सहकारी बँक क्षेत्रातील पुरस्कारांचे नुकतेच वितरण करण्यात आले. दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेचे महाव्यवस्थापक विनोद रावदका यांनी या समारंभात हे पुरस्कार स्वीकारले.

दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेस या वर्षी सहकार क्षेत्रातील विविध तीन नामांकित संस्थाकडून




पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने दि महाराष्ट्र अर्बन कॉ-ऑपरेटिव्ह बॅंक्स् फेडरेशन लिमिटेड या संस्थेमार्फत सन २०२३ - २४ करीता सर्वोत्कृष्ट बँक, दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक असोसिएशन या संस्थेमार्फत पगारदार सहकारी बँक श्रेणीमध्ये प्रथम पुरस्कार आदींचा देखील समावेश आहे.

३१ मार्च २०२४ अखेरीस महानगरपालिकेच्या ७१ हजार १३ अधिकारी - कर्मचाऱ्यांनी दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेचे सभासदत्व स्वीकारले आहे. कोअर बँकींग, आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी., ई-कॉमर्स, पॉस इत्यादी सुविधा देणाऱ्या दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँकेची मुंबई शहर व उपनगरात विविध ठिकाणी स्वमालकीची १० ए.टी.एम. केंद्र आहेत. बँकेने मोबाईल बँकींग सुवा सुरू केली असून अद्ययावत तंत्रज्ञानाद्वारे ग्राहकांना सुविधा पुरविली जात असल्याचे बँकेचे महाव्यवस्थापक विनोद रावदका यांनी सांगितले.

**पश्चिम रेल्वे चालविणार आहेत विशेष गाड्या**

| गाडी क्र. | मुळ स्थानक आणि गंतव्यस्थान | सेवांचे दिवस | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०५०२२ | उधना - छपरा (अनारक्षित) | ३०.१०.२०२४ | २०:०० वा. (बुधवार) | ०७:३० वा. (शुक्रवार) |
| थांबे : सुरत, वडोदरा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर, भरतपूर, मथुरा, कासगंज, बुदौन, बरेली, पिलीभीत, मल्हौर, लखीमपूर, सीतापूर, बुरवाल, गोंडा, बस्ती, खलीलाबाद, गोरखपूर, देवरिया सदर आणि सिवान स्टेशन्स. | | | | |
| रचना : जनरल सेकंड क्लास कोचेस. | | | | |
| ०५०३० | वांद्रे टर्मिनस-गोरखपूर (अनारक्षित) | ३१ ऑक्टो. २०२४, ०४, ०८ आणि १२ नोव्हें. २०२४ | ०७:१० वा. | १६:१५ वा. (पुढिल दिवशी) |
| ०५०२९ | गोरखपूर-वांद्रे टर्मिनस (अनारक्षित) | ०२, ०६ आणि १० नोव्हे. २०२४ | १९:०० वा. | ०५:०० वा. (दुसऱ्या दिवशी) |
| थांबे : बोरीवली, वापी, वलसाड, उधना, सुरत, वडोदरा, रतलाम, कोटा, भरतपूर, मथुरा, कासगंज, फर्रुखाबाद, कानपुर सेंट्रल, लखनऊ , गोंडा, बस्ती आणि खलीलाबाद स्टेशन दोन्ही दिशांना. | | | | |
| रचना : जनरल सेकंड क्लास कोचेस. | | | | |

वेळ आणि थांबे यासंबंधित अधिक माहितीकरीता, प्रवाशांनी कृपया www.en-quiry.indainrail.gov.in वर भेट द्यावी.

पश्चिम रेल्वे
wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा: X.com/WesternRly

सर्व आरक्षित तिकिटांकरीता मुळ आयडी पुरावा सोबत ठेवा.

कोण माझ्याविषयी काय विचार करतात यावर माझे यशापयश अवलंबून नाही.



- डॉ. होमी जहांगीर भाभा
अणुशास्त्रज्ञ

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, ३० ऑक्टोबर २०२४

# नव्या घरांच्या विक्रीला घरघर!

स्वतःचे घर असावे हे प्रत्यकाचे स्वप्न असते. छोटे का होईना त्याच्या चार भिंतींचा निवारा सुखावणारा असतो. असे असले तरी गेल्या काही महिन्यांपासून घर विक्रीला अपेक्षित उठाव मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. प्रगती आणि विकासाच्या वाटेवर आगेकूच सुरू असली तरी गृहविक्री क्षेत्राला फारसा लाभदायक काळ आलेला नाही. मुंबई, ठाणे, पुण्यासह अनेक मोठ्या शहरांत गृहनिर्माण प्रकल्प आणि त्या माध्यमातून अनेक घरे तयार असली तरी त्यांची विक्री होत नसल्याने हा उद्योग अस्थिरतेच्या काठावर आला आहे. परवडणाऱ्या घरांच्या किमती खिशाला परवडत नसल्याने ही स्थिती आली आहे. असे असले तरी दुसरीकडे आलिशान आणि मोठ्या घरांची विक्री होत असल्याचे दिसते. गेल्या काही वर्षांत घर खरेदी करणाऱ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ झाली होती. याचबरोबर काही ठरावीक लोकांमध्ये मोठी आणि आलिशान घरे खरेदी करण्याची आवडही वाढली. मात्र यंदा जुलै-सप्टेंबरमध्ये घरांच्या विक्रीत मोठी घट नोंदवली गेली. या कालावधीत देशातील सात मोठ्या शहरांमध्ये १.०७ लाख घरांची विक्री झाली. गेल्या वर्षी याच कालावधीत हा आकडा १.२ लाख इतका होता. घराच्या वाढत्या किमती हेच यामागील एकमेव कारण असल्याचे स्पष्ट आहे. देशातील गृहनिर्माण क्षेत्रात गेली दोन वर्षे तेजीचे वारे होते. प्रमुख महानगरांत सातत्याने घरांच्या विक्रीत वाढ होत होती. विक्रीत वाढ होत असल्याने नवीन घरांच्या पुरवठ्यात आणि किमतीतही वाढ होत होती. पण आता मात्र देशभरात घरांच्या विक्रीला घरघर लागली आहे. यामुळे गृहनिर्माण क्षेत्राच्या वाढीबाबत चिंता व्यक्त होत आहे. घरांची खरेदी दिवसेंदिवस महागत चालली आहे. देशभरात गेल्या दोन वर्षांत घरांच्या किमती सरासरी २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. घरांच्या किमतीत बंगळुरू, दिल्ली, कोलकाता या महानगरांमध्ये तब्बल ३० टक्के वाढ झाली आहे. याचवेळी मुंबईत २ टक्के आणि पुण्यात २० टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. ग्राहकांकडून घरांना वाढत असलेली मागणी घरांच्या किमती वाढण्यास कारणीभूत ठरली. त्यातही मध्यम आकाराच्या आणि आलिशान घरांना अधिक पसंती मिळत असल्यानेही किमती वाढल्या आहेत. बांधकामाच्या खर्चात वाढ झाल्याचे कारणही किंमत वाढण्यामागे असल्याचा दावा केला जातो. उपलब्ध माहितीनुसार देशातील एकूण विक्री न झालेल्या घरांचा साठा मोठा राहिला आहे. अगदी मुंबई, ठाण्यात अनेक नवीन प्रकल्प सुरू असले तरी यापूर्वी तयार झालेली असंख्य घरे विक्रीविना पडून असल्याचे बोलले जाते. असे असले तरी रोज नवनव्या प्रकल्पांचा धडाका सुरू आहे. मुंबई, नवी दिल्ली आणि बंगळुरू या प्रमुख तीन शहरांमध्ये मालमत्तेच्या किमती १० टक्क्यांपेक्षा अधिक वाढल्या. यामुळे सध्या अनेक सामान्यांना घर खरेदी करणे अवघड होत आहे. एप्रिल ते जून २०२४ या तीन महिन्यांमध्ये देशातील प्रामुख्याने मुंबई, नवी दिल्ली आणि बंगळुरू या प्रमुख तीन शहरांमध्ये घरांच्या किमती गगनाला भिडल्या होत्या. मुंबईमध्ये तर घरांच्या किमती इतक्या वाढल्या आहेत की मालमत्तेच्या दरात वाढ होणाऱ्या जगातील प्रमुख शहरांमध्ये मुंबई दुसऱ्या क्रमांकावर आहे. मुंबईतील घरांच्या किमती वार्षिक आधारावर १३ टक्क्यांनी वाढल्या आहेत. अर्थात मागील वर्षीच्या जूनच्या तिमाहीमधील घरांच्या किमतींच्या तुलनेत यावर्षीच्या तिमाहीत मुंबईतील घरांच्या किमती १३ टक्क्यांनी वाढल्या आहेत. हा आकडा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरांच्या आकडेवारीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. याचबरोबर राजधानी नवी दिल्लीच्या सर्वच रहिवासी भागांमध्ये घरांच्या किमतींमध्ये १० टक्क्यांहून अधिक तेजी पाहायला मिळाली आहे. नवी दिल्ली येथील रहिवासी भागातील जागांचे दर वार्षिक आधारावर जूनमध्ये संपलेल्या तिमाहीमध्ये साडेदहा टक्क्यांनी वाढले आहेत. तर बंगळुरू येथील घरांच्या दरात वार्षिक आधारावर जवळपास चार टक्के इतकी वाढ नोंदवली आहे. घरांच्या किमती सर्वाधिक वाढणाऱ्या शहरांमध्ये नवी दिल्ली तिसऱ्या तर बंगळुरू जागतिक पातळीवर १५ व्या स्थानावर आहे. काही मोजक्याच भारतीय लोकांकडे सध्या मोठ्या प्रमाणात पैसा येत असल्याचेसुद्धा सांगण्यात येते. याशिवाय काही लोक वेगाने श्रीमंत होत आहेत. उच्चभ्रू लोकांना घर खरेदीसाठी आश्वासक वातावरण असले तरी मध्यम आणि त्याखालील वर्ग हा घर खरेदीसाठी अजूनही पात्र ठरत नाही, ही वस्तुस्थिती आहे. देशांतर्गत बाजारातील रिअल इस्टेट क्षेत्राच्या वाढीमध्ये सर्वाधिक योगदान हे प्राथमिक क्षेत्रातील आहे. त्यामुळे येत्या काळात भारतीय बाजारात घरांच्या मागणीत वाढ होऊन घरांच्या किमती चढ्याच राहण्याची शक्यता आहे. पावसाळा आणि खरेदीसाठी अशुभ समजला जाणारा काळ या बाबी प्रामुख्याने घरांची विक्री कमी होण्यास कारणीभूत ठरल्या. पितृपक्षामुळे प्रामुख्याने नवीन वस्तूंची खरेदी झाली नाही. त्यामुळे या कालावधीत घरे आणि वाहने यांची खरेदी कमी झाल्याचे दरवर्षी पाहायला मिळते. यामुळे घरांची विक्री कमी झालेली दिसून येत आहे. घरांची विक्री कमी होण्यास इतरही कारणे आहेत. गेल्या काही वर्षांपासून घरांच्या किमतीत वाढ सुरू असल्याने ग्राहकांकडून खरेदीसाठी आखडता हात घेतला जात आहे. गेल्या दोन आर्थिक वर्षांत सव्वाआठ लाख हजार नवीन घरांचा पुरवठा झाला असून, सात लाख ७२ हजार घरांची विक्री झाली. गेल्या दशकभरात मागणीपेक्षा घरांचा पुरवठा अधिक झाला ही बाब विसरून चालणार नाही. देशातील सात महानगरांत २०१३- २०२० या सात वर्षांत २३ लाख ५५ हजार नवीन घरांचा पुरवठा झाला, तर २० लाख ६८ हजार घरांची विक्री झाली. लोकसंख्येत सुरू असलेली वाढ, वाढते नागरीकरण यामुळे घरांची मागणी वाढत आहे. मोठ्या संख्येने लोक शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत. त्यातून घरांच्या मागणीत वाढ होऊन किमतीतही वाढ होताना दिसत आहे. घरभाड्यातही चांगलीच वाढ होत आहे. घरांच्या किमतीत गेल्या दशकभरापासून सातत्याने वाढ नोंदविण्यात आली आहे. गेल्या दोन आर्थिक वर्षात मात्र घरांच्या किमतीत १३ टक्के वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दरात १.४ टक्के घट होऊन तो ५.४ टक्के नोंदविण्यात आला. यंदा तिसऱ्या तिमाहीत एकूण १ लाख ७ हजार ६० घरांची विक्री झाली. गेल्या वर्षी याच कालावधीत ही विक्री १ लाख २० हजार २९० होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा घरांच्या विक्रीत ११ टक्के घट झाली आहे. सर्व महानगरांत घरांच्या विक्रीत घट नोंदविण्यात आली. याच वेळी नवीन घरांच्या पुरवठ्यातही घट झाली आहे. गेल्या वर्षी तिसऱ्या तिमाहीत नवीन घरांच्या पुरवठा १ लाख १६ हजार २२० होता. यंदा तिसऱ्या तिमाहीत तो ९३ हजार ७५० वर घसरला आहे. महागाई दरात घट होत असताना घरांच्या किमतीतील वाढ कायम आहे. गृहनिर्माण क्षेत्राने यंदा पहिल्या तिमाहीत उच्चांक गाठला. त्यानंतर आता गृहनिर्माण बाजारपेठ आता सामान्य पातळीवर स्थिरावू लागली आहे. घरांच्या किमती वाढल्या असून त्याही आता स्थिरावू लागल्या आहेत. आगामी काळ सणासुदीचा आहे. या काळात अनेक लोक नवीन खरेदीला प्राधान्य देतात. त्यामुळे जवळपास सर्वच विकासक सध्या सुरू असलेल्या सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सवलती जाहीर करून ग्राहकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे पाहावयास मिळते. यामुळे पुढील काळात घरांच्या विक्रीत वाढ होण्याचा अंदाज आहे. असे असले तरी पुढील काही तिमाहीमध्ये घरांच्या विक्रीतील वाढ गेल्या दोन वर्षांएवढी नसेल. त्यामुळे घरांच्या विक्रीतील वाढीचा वेग पुढील काही काळ फारसा असणार नाही.

# नरकासुराचे उदात्तीकरण नको !

वसुबारस आणि धनत्रयोदशी हे दिवाळीतीलच सण असले, तरी खरी दिवाळी सुरु होते ती नरक चतुर्दशी पासून. या दिवशी बहुतांश घरांत बच्चे कंपनीसह वयोवृद्ध आजी आजोबाही पहाटे लवकर उठून अंगाला सुगंधी तेल आणि सात्विक उटणे लावतात. शीतोष्ण पाण्याने अभ्यंग स्नान करतात आणि स्नानानंतर ओल्या अंगाने डाव्या पायाच्या अंगठ्याखाली नरकासुराचे प्रतीक म्हणून कारेटे ठेवून ते फोडतात. त्यातून निघणाऱ्या बियांपैकी एक बी कपाळाला लावतात आणि रक्ताचे प्रतीक असलेला त्यातील कडू रस थोडा जिभेला लावतात. श्रीमद्भागवतपुराणातील कथेनुसार पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो प्रचंड त्रास देत असे. तो स्त्रियांचाही छळ करत असे. त्याने ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले आणि कुणाकडूनही वध होणार नाही - असा वर मागून घेतला होता. त्या वराच्या बळावर त्याने अनेक राजांना हरवून त्यांच्या कन्या आणि त्या राज्यांतील स्त्रियांचे अपहरण केले होते.

नरकासुराने अश्या एकूण १६,१०० स्त्रियांना पळवून नेले आणि मणिपर्वतावर एक नगर वसवून त्यात त्यांना बंदी बनवून ठेवले होते. त्याने राजांची संपत्ती लुटली होती हव्यासापोटी त्याने देवमाता अदितीची कुंडले आणि वरुणाचे विशाल छत्रही बळकावले होते. त्याला मिळालेल्या वरामुळे तो देव, गंधर्व आणि मानवांना तापदायक झाला होता. अनेक गिरिदुर्गांनी वेढलेले प्राग्ज्योतिषपूर हे नगर त्याची राजधानी



होती. ही राजधानी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या खंदकांनी अग्नी, पाणी इत्यादींनी वेढलेली होती. त्याच्या या बलपूर्वक छळाने समस्त देवता आणि राजे महाराजे त्रस्त झाले होते. त्याच्या जाचातून मुक्त होण्यासाठी सर्वांनी मिळून श्रीकृष्णाचा धावा केला. नरकासुराला जन्माची अद्दल घडवण्यासाठी श्रीकृष्णाने सत्यभामेसह नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व उपवर राजकन्यांना मुक्त केले.

नरकासुराच्या बंदिवासातील कन्यांना त्यांचे स्वजन स्वीकारणार नाहीत, हे जाणून कृष्णाने या १६,१०० कन्यांसोबत विवाह केला आणि त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. उन्मत्त झालेल्या नरकासुराला श्रीकृष्णाने ठार करून देवतांसह प्रजाजनांना भयमुक्त केले. असे असताना गोव्यासारख्या काही ठिकाणी दिवाळीनिमित्त भगवान श्रीकृष्णाचे पूजन करण्याऐवजी नरकासुर वधाची स्पर्धा आयोजित केले जाते. ज्यामध्ये तेथील मंडळे, संस्था, संघटना मोठ्या प्रमाणात भाग घेतात. या स्पर्धेसाठी प्रत्येक मंडळ नरकासुराचा भव्य पुतळा बनवतात. त्याची मिरवणूक काढली जाते. नागरिकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जरी या स्पर्धेचे आयोजन केले जात असले, तरी या माध्यमातून दुराचारी नरकासुराचे उदात्तीकरण करत आहोत हे नागरिकांच्या केव्हा लक्षात येणार ? गोव्यातील नरकासुर स्पर्धेचे लोण हळूहळू सिंधुदुर्गातही येत चालले आहे. ज्यामुळे या सणामागील मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. असुरी प्रवृत्तीला खतपाणी घालणाऱ्या या स्पर्धेला खरेतर नागरिकांनीच विरोध करायला हवा !

- जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

# डॉ. होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले.

वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली.



त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

१९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या मॉं ब्लॅं या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
पुणे

## पत्र मानस

### विनाशकाले विपरीत बुद्धी

संगमनेर येथे महायुतीचे सुजय विखे पाटील आणि मविआ तर्फे कॉग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात याची मुलगी जयश्री थोरात याच्यात लढत होत आहे.पण या निवडणूकीच्या प्रचारात राजकारणाची पातळी कोणत्या थराला गेली याचा प्रत्यय जनेतेला आला.भाजप वयोवृद्ध नेते वसंत देशमुख याच्या मुखातून जयश्री थोराताबद्दल अपशब्द बाहेर पडले आणि साहजिकच तेथे राडा झाला.भाजप हा सुसंस्कृत पक्ष असल्याचे समजतात पण या घटनेने मात्र भाजपची नाचक्की झाली आणि सुजय विखे याना वाटत असलेला विजय हातातुन निसटतोय काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.आश्चर्य म्हणजे अजित पवारानी सुजय विखे यांची कानउघडणी केली पण भाजपच्या कोणत्याही वरिष्ठ नेत्यानी वसंत देशमुख याना झापले नाही.उद्या विखेंचा जर पराभव झाला तर विनाशकाले विपरित बुद्धी असेच म्हणावे लागेल.

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

### सुरक्षित प्रवासाबाबत प्रश्न

देशात गेल्या पाच महिन्यांत २८ मोठे रेल्वे अपघात झाले आहेत. त्या अपघातात रेल्वेच्या सुविधांचे आणि यंत्रणेचे मोठे नुकसान झाले.सततच्य रेल्वे अपघाताच्या घटना घडत असून रेल्वे प्रशासन मात्र काहीच हालचाली करत नाही, अशी विरोधक टिका करत आहेत.पण रेल्वेमार्गांवर अचानक अपघात कसे होऊ लागले?गेल्या काही महिन्यांत झालेले रेल्वे अपघात हे निव्वळ अपघात नसून ,तो घातपाताचा प्रकार आहे.देशातील काही कंरट्या लोकांनी आता आपल्या धर्मांधतेसाठी रेल्वेला लक्ष केल्याचे निदर्शनात आले आहे.देशांतर्गत हितशत्रूंचे सुसंगत कारस्थान तर नाही ना, असा संशय निर्माण झाला आहे. हजारो किलोमीटर लांबीच्या रेल्वेमार्गाच्या प्रत्येक भागावर देखरेख करणे अशक्य आहे.रेल्वेसह भारतीय रेल्वेतील सार्वजनिक जीवनाच्या सुरक्षेची हमी पुन्हा एकदा रुळावरून घसरली आहे. रेल्वेमध्ये सुरक्षेची जबाबदारी असलेली सुमारे दीड लाख पदे रिक्त आहेत.पुरेसे मनुष्यबळ नसल्याने होणारे अपघात कधी थांबणार?

**- विवेक तवटे, कळवा, ठाणे**

### अखेर भारताची जनगणना होणार

देशातील लोकसंख्या किती आहे हे समजण्यासाठी तसेच लोक संख्येच्या प्रमाणात आणि मागणीनुसार वेगवेगळे धोरणे आखणी व अंमलबजावणी करायची असते त्यासाठीच जनगणना कार्यक्रम असतो. भारतात ब्रिटिशकाळापासून जनगणना चालू आहे तर स्वातंत्र्य नंतर दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते पण कोविड आल्यामुळे नियोजित सन २०२१ ची जनगणना होऊ शकली नव्हती तर त्याआधी सन २०११ मध्ये जनगणना झालेली आहे. भारत सरकारच्या वतीने देशाची जनगणना करण्याचे सर्व अधिकार हे जनगणना आयुक्त याना दिलेले आहेत आणि आयुक्त यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी सरकारने वाढविला असल्यामुळे आता जनगणना लवकरच होणार हे जवळपास निश्चितच झाले आहे. विरोधकानी जनगणना हा मुद्दा निवडणूकीला केला होता तर मागील अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री यानी जनगणना देखील होणार आणि लोकसभा मतदारसंघाची फेररचना देखील होणार असल्याची माहिती संसदेत दिली आहे. म्हणजेच खासदारांची संख्या वाढणार आहे आणि त्यासाठी नविन संसद भवन सक्षम आहे. थोडक्यात प्रलंबित असलेली जनगणना पुढील वर्षी नक्कीच होईल असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### मुंबईभोवतीच नवी शहरे वसविण्याचे नेमके प्रयोजन काय.?

मुंबईजवळच केएससी न्यू टाऊन या नावाने ओळखली जाणारी तिसरी मुंबई विकसित करून मुंबई शहरावरचा ताण कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. न्हावा - शिवडी लिंक पलीकडील नविन शहर विकास प्राधिकरणा अंतर्गत तिसरी मुंबई उभारण्यावर राज्य सरकारने शिक्कामोर्तब केल्यावर १२४ गावांतील ३२३ चौ. कि मीटर्स क्षेत्राचा विकास एमएमआरडीमार्फत करण्यात येणार आहे. एमएमआरडी ने रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल, उरण, उलवे आणि कर्जत परिसरातील १२४ गावांपैकी कर्नाळा हे पक्षी अभयारण्य आणि ऐतिहासिक किल्ला असणारे शहर आहे तर साई हे पश्चिम घाटातील हिरवाईसाठी व निसर्गप्रेमींमध्ये आवडते ठिकाण आहे. भारतातील सर्वात मोठ्या कंटेनर बंदरांपैकी प्रसिध्द असे जेएनपीटी हे बंदर चिरनेर येथे आहे. कर्नाळा, साई व चिरनेर या तीन गावांच्या नावांवरून केएससी न्यू टाऊन असे नांव असलेल्या शहराचे अधिकृत नामकरण जाहीर केले आहे. नव्या स्मार्ट सिटी प्रमाणे सर्व अत्याधुनिक आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिली जाणारी ही पर्यावरणपुरक टाऊनशिप सिटी असेल असे सरकारने म्हटले आहे. सिडको प्राधिकरणाच्या क्षेत्रांतील नैना, खोपटासह नऊ अन्य गावांत विकास करण्यासाठी खरिदलेल्या विकासकांनी व स्थानिक शेतकऱ्यांनी हे क्षेत्र बड्या बिल्डर्स आणि धनदांडग्यांच्या हाती सुपूर्द करण्यासाठीच हा घाट घातला आहे अशा अंदाजाने या योजनेवर संशय व्यक्त केला आहे. देशभरात दिल्ली व जवळपास असणाऱ्या, नोएडा,अमृतसर, भिवडी,जयपूर, सोनीपत यांसारख्या अकरा शहरांत प्रदूषणाची पातळी धोकादायक मर्यादेपुढे जाऊन पोहोचली आहे. दिल्ली शहरात रस्त्यांवर पाण्याची फवारणी करून प्रदूषण नियंत्रित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. आधीच वाढलेल्या प्रदुषणात दिवाळीच्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे आणखी प्रदुषणात भर पडणार आहे हे ओळखून दिल्ली प्रदूषण नियंत्रण मंडळाने हरित फटक्यांसह फटाके बनविणे, त्यांचा साठा करणे व विक्री करणे यांवर बंदी घातली आहे. ऐन उत्सवकाळात घातलेल्या बंदीमुळे नागरिक व मुलांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. उत्सवकाळात घातलेल्या बंदीमुळे होणारे परिणाम हे तात्पुरत्या स्वरूपाचे असतात. अल्पावधीतच त्यांचा प्रभाव कमी होऊ लागतो. परंतु नैसर्गिक आणि मानवनिर्मित प्रदूषण हे जवळजवळ बारमाही काळात नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम घडवून आणत असतात याकरिता बिगर उत्सव काळात सतत होत असणाऱ्या प्रदूषणाचे मोजमाप करून त्या प्रदूषणाला पूरक बाबी कोणत्या असतात हे लक्षात घेऊन त्यावर गंभीरता आणि सातत्य राखून उपाय योजना केल्यास प्रदूषणाची समस्या रोखण्यात बऱ्यापैकी यश मिळू शकते. मुंबई आणि परिसरात होत असलेल्या प्रदूषणावर नियंत्रण राखण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे आखून त्यांची विभागवार अंमलबजावणी करण्यासाठी यासाठी पथकांची नेमणूक करण्यात येणार आहेत. शिवाय निवासी इमारती, खाजगी कार्यालये, विकासक, कंत्राटदार यांच्यावर काही प्रमाणात कामगिरी सोपविण्याच्या शक्यता आहेत. पावसाळ्यानंतर शहरातील नैसर्गिक परिस्थितीमुळे हवेत साठून राहिलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही, हेच साठलेले धूलिकण आणि मानवनिर्मित कारणे प्रदुषणात भर घालत असतात. गेल्या काही वर्षांपासून शहर व परिसरात पायाभूत सुविधा, निवासी आणि व्यवसायिक संकुले, नवनव्या प्रकल्पांच्या बांधकामांमुळे हवा अधिकाधिक प्रदूषित होत आहे. नागरीकांना ते सहन करण्याशिवाय पर्याय उरलेले नाहीत. हवा, प्रदूषण, वाहतूक कोंडी, नोकरी उद्योगधंद्याच्या निमीत्ताने परप्रांतांतून येणारे लोंढे यांना हाताळणे दिवसेंदिवस कठीण होऊन बसत आहे. तरीही मुंबई पाठोपाठ नवी मुंबई आणि आता तिसरी मुंबई विकसित करण्याचे ठरविले आहे. नुकतीच वांद्रे स्थानकात रेल्वेगाडी पकडतांना झालेल्या चेंगराचेंगरीत अनेकांना शारिरीक इजा झाली. अशाच प्रकारच्या गर्दीत मुंबई निवासी आपले जीवन कंठत आहेत याचा अंदाज प्रशासकांना तर आहेच. परंतु एकाच परिसराला लागून असलेल्या परिसरांचा विकास करण्यात येत आहे. त्याचवेळी मुंबई महाराष्ट्रातील उद्योगधंदे महाराष्ट्राबाहेर नेले जात आहेत, यामागे राजकारणापेक्षा शास्त्रीय, व्यावसायिक दृष्टिकोनातून मुंबई, ठाणे, पुणे पलिकडील क्षेत्रांतील शहरांचा उद्योग व्यवसाय निर्मिती करण्यासाठी केल्यास लोकांचे मुंबई व परिसरात एकवटणे, दाटीवाटीने राहणे, सर्व प्रकारच्या कोंडीत सापडणे अशी दुखणी कमी होऊन लोकसंख्येचा प्रादेशिक समतोल राखता येईल. लोकांना मोकळेपणाने वावरता येईल. सध्या मुंबईतील रस्त्यांच्या रुंदीकरणाला मर्यादा आल्या आहेत. मेट्रो, मोनो रेल, नवीन वाहतुकीचे पूल यांनी सोय झाली असे वाटत असले तरी रस्त्यांवर रोज रोज येणारी नवी वाहने, वाहन चालक, परप्रांतातून येणारा नोकरवर्ग यांमुळे रस्त्यांवरील वर्दळ कमी होत नाही. नवागतांना मर्यादा घालणे शक्य होत नाही त्यामुळे सर्वच बाबतीत होणारा त्रास स्थानिक तसेच बाहेरून येणाऱ्यांसाठी असह्य होत चालला आहे त्यावर कुठेतरी मर्यादा घालण्याची गरज भासत आहे. याकरिता लगतचे अविकसित प्रदेश विकासाकडे झुकतील अशा योजना प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. म्हणजेच सत्तेच्या चाव्या हाती घेतल्यावर ज्या कारणांसाठी जनतेने निवड करतांना ज्या अपेक्षा सत्ताधाऱ्यांकडून बाळगलेल्या असतात त्यांच्या पूर्ततेसाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याची प्राथमिक गरज अधिक हितावह असते हे ध्यानी ठेवून नव्या योजनांची आखणी करावी असे सुचवावेसे वाटते."

**- स्नेहा राज, गोरेगांव.**



**पनवेल :** महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने आज शेकापचे उरण विधानसभेचे उमेदवार प्रितम म्हात्रे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी त्यांनी सांगितले की, ही उमेदवारी केवळ माझी नाही... उरण विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य कष्टकरी जनतेचा हा सन्मान आहे. विधानसभा सभेतील जिवाभावाच्या माणसांच्या सेवेसाठी घेतलेले व्रत अखंडपणे सुरूच असेल हे मी सर्वांना वचन देतो ! उरणमध्ये बदल अटळ आहे... असेही ते आवर्जून म्हणाले.

## म ह त्त्वा चे

### मुख्यमंत्र्यांच्या मिरवणुकीत चोरटे मोकाट

**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी वागळे इस्टेट भागात मिरवणुक काढण्यात आली होती. या मिरवणुकीमध्ये चोरट्यांचा देखील सुळसुळाट असल्याचे स्पष्ट झाले आहे. मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्या माजी नगरसेवक तसेच शिंदे गटाच्या काही पदाधिकाऱ्यांचा साडे सहा लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. चोरीला गेलेल्या वस्तूंमध्ये १२ आणि सहा तोळ्यांच्या सोनसाखळी, ५०-५० हजारांच्या रोकडचा देखील सामावेश आहे. याप्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कोपरी पाचपाखाडी मतदार संघातून निवडणुक लढवित आहेत. सोमवारी त्यांनी या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी मिरवणुकीद्वारे शक्तीप्रदर्शन केले. शिंदे यांच्यासोबत मिरवणुकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील होते. शिवसेना (शिंदे गट), भाजप आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. या गर्दीचा गैरफायदा चोरट्यांनी घेतला. या मिरवणुकींमध्ये चोरट्यांचा सुळसुळाट झाला होता.

### मोठागाव फाटकातील खडी जीवघेणी

**डोंबिवली :** मोठागाव येथील रेल्वे फाटकातील रुळांच्या मार्गिकेत ठेकेदाराने मोठी खडी आणून टाकली आहे. या मोठ्या खडीवरून प्रवास करताना वाहनाचे चाक खडीत फसत आहे. यातून मार्ग काढताना कधी कधी दुचाकीचालकांचा तोल जात आहे. या खडीवरून प्रवास करणे चालकांसाठी जीवघेणे ठरत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासन याकडे कधी लक्ष देणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. .रेल्वे अपघात रोखण्यासाठी, तसेच रेल्वेचे वेळापत्रक सुधारण्यासाठी प्रशासनाने अनेक मार्गांवरील रेल्वे फाटक बंद केली आहेत; मात्र डोंबिवली पश्चिमेकडील मोठागाव येथील रेल्वे फाटक अद्याप बंद केलेले नाही. या ठिकाणचे रेल्वे उड्डाणपुलाचे काम मार्गी लागलेले नाही. परिणामी वाहनचालक आजही रेल्वे फाटक ओलांडून प्रवास करत आहेत. मोठागाव-मानकोली उड्डाणपूल झाल्याने भिवंडी, ठाणे या दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. ही वाहने मोठागाव रेतीबंदर रेल्वे फाटकातून ये-जा करतात.

# महायुतीचे धोरण म्हणजे महाराष्ट्र विका, पण महायुतीला सत्तेत बसवा!

## जितेंद्र आव्हाड संतापले

प्रतिनिधी
**ठाणे**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी महायुती सरकारला आज चांगलेच घेरले. हे सरकार येत्या निवडणुकीत पराभूत होणार आहे. याची जाणीव महायुतीच्या सर्व नेत्यांना झाली आहे, असा दावा त्यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नाशिक पूर्व मतदार संघाचे उमेदवार गणेश गीते यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आव्हाड नाशिकला आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

ते म्हणाले, राज्यात आणि सगळीकडे मतदारांमध्ये प्रचंड उत्साह आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. जनतेने यंदा



राज्यात सत्तांतर करायचेच असे निश्चित केले आहे, असा दावा केला. आमदार आव्हाड म्हणाले, सध्याच्या सरकारने अनेक प्रश्न भिजत ठेवले. सामाजिक तेढ निर्माण होईल, असे निर्णय घेतले. मराठा, ओबीसी, दलित, मुसलमान या समाजामध्ये लढाया होतील, असे त्यांचे धोरण आहे.

आमची विचारधारा ही छत्रपती शाहू, महात्मा फुले आणि डॉ आंबेडकर यांची आहे. ही विचारधारा वाचविण्यासाठी मी राज्यभर फिरेल. येत्या निवडणुकीत या सरकारने केलेल्या सामाजिक वादाच्या निर्णयाचे प्रकार उघड करीन, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले. यावेळी आव्हाड यांनी भारतीय जनता पक्ष आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामकाजाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले, सध्याचे सरकार महाराष्ट्राच्या हिताकडे आणि विकासाकडे पूर्णतः दुर्लक्ष करीत आहे. गुजरातच्या पायावर डोकं ठेवून हे लोक काम करीत आहेत.

सर्व उद्योग आणि महत्त्वाचे प्रकल्प गुजरातला जात आहेत. असेच सुरू असले तर आपल्या मुलांना लवकरच नोकरीसाठी गुजरातला जावे लागेल. आता तशी स्थितीत निर्माण झाली आहे. हे वातावरण माझ्या देखील मतदारसंघात आहे.

जनतेला महायुतीचे सरकार कोणासाठी काम करते, हे ओळखून मतदान करावे लागेल. राज्यातील महायुतीला महाराष्ट्र विका पण आम्हाला सत्तेत बसवा, असे वाटू लागले आहे. यांना महाराष्ट्राची आणि महाराष्ट्रातील जनतेची काडीची ही काळजी राहिलेली नाही. त्यामुळे या सरकारला फेकलेच पाहिजे. आमदार आव्हाड यांनी सिंचन घोटाळ्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, उपमुख्यमंत्री पवार यांचे सध्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर चांगलेच प्रेम वाढले आहे. त्यांची जवळीक रोज वाढत आहे.

# मीरा भाईंदर विधानसभेची भाजपची उमेदवारी नरेंद्र मेहतांना

## शेवटच्या दिवशी सुटला तिढा

प्रतिनिधी
**भाईंदर**



मीरा भाईंदर विधानसभा मतदार संघाचा महायुती आणि नंतर भाजपात जागा वाटप , उमेदवारी वरून चाललेला अटीतटीचा तिढा अखेर उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सुटला आहे . भाजपाकडून मंगळवारी सकाळी प्रसिद्ध केलेल्या यादीत माजी आमदार नरेंद्र मेहता यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे . त्यामुळे मेहता समर्थकांनी जल्लोष केला आहे .

मीरा भाईंदरच्या माजी महापौर राहिलेल्या गीता जैन यांनी २०१९ मध्ये तत्कालीन भाजपाचे उमेदवार आ . मेहतांचा पराभव केला होता व आमदार म्हणून निवडून आल्या होत्या . त्यावेळी देखील जैन यांनी भाजपा कडून उमेदवारी मागितली होती . परंतु मेहता हे भाजपा नेते देवेंद्र फडणवीस आणि मंत्री रवींद्र चव्हाण यांचे मर्जीतले मानले जात असल्याने त्यावेळी देखील मेहतांच्या विरोधात शहरातील वातावरण असताना मेहतांना उमेदवारी दिली गेली होती .

आमदार झाल्यावर जैन ह्या फडणवीस यांची भेट घेऊन भाजपा सोबत गेल्या . मात्र सरकार बदलल्याने शिवसेनेला पाठिंबा दिला . ठाकरे सरकार पडणार असते वेळी जैन ह्यांना परत भाजपाने जवळ केले . तर भाजपा नेत्याच्या सुचणे नुसार त्या एकनाथ शिंदे यांच्या गोटात सहभागी होत गुवाहाटीला गेल्या . शिंदे - फडणवीस ह्या दोघांनी जैन यांना उमेदवारी देण्याचे आश्वस्त केले होते . दुसरीकडे शिंदे सेनेने मीरा भाईंदर वर दावा केला .

मीरा भाईंदर मतदार संघ भाजपाच्या वाट्याला शेवटच्या क्षणी गेला तशीच भाजपाची उमेदवारी देखील शेवटच्या क्षणी २९ ऑक्टोबर रोजी नरेंद्र मेहता यांना दिली गेली . ह्या वरून सदर मतदार संघात महायुतीत रस्सीखेच होती तेवढीच भाजपात उमेदवारी मिळवण्या वरून होती असे स्पष्ट होते . मेहता यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला आहे . उमेदवारी मिळण्या आधी मेहतांनी आपले विविध प्रकारे शक्ती प्रदर्शन चालवले होते . तर मेहतांनी स्वतः सह त्यांच्या पत्नीचा उमेदवारी अर्ज भाजपा आणि अपक्ष म्हणून सोमवारीच भरला होता . पक्षाची उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष निवडणूक लढवण्याची देखील त्यांची तयारी असल्याची चर्चा होती .

# पेणकरपाडा शाळेतील विद्यार्थ्यांनी साजरा केला लोकशाही उत्सव



प्रतिनिधी
**भाईंदर**

145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयामार्फत मतदारांमध्ये जनजागृती करणे कामी सकाळी १०.०० वाजता मनपा शाळा क्रं. 14 पेणकर पाडा या शाळेतील विदयार्थी, शिक्षक आणि स्विप पथकाव्दारे पेणकर पाडा गावातील मतदारांना जागृत करण्यासाठी प्रभात फेरीचे आयोजन करून 20 नोव्हेंबर 2024 रोजी मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. पेणकरपाडा मतदान केंद्रावर 2019 लोकसभेला कमी मतदान झाले असल्याने लोकशाही उत्सव् साजरा करुन पेणकरपाडा परिसरात जनजागृती करण्यात आली.

सदर शाळेच्या विदयार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा विशाळगड बनवून त्याच्या आजूबाजूला मतदानाचे संदेश लावण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी रांगोळीद्वारे जनजागृती केली. सुंदर अशी दिव्यांची आरास करून 20 नोव्हेंबर रोजी मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. मतदार प्रतिज्ञा घेऊन विदयार्थ्यांनी लोकशाहीचा उत्सव् आंनदात साजरा केला.

# भरत गोगावलेंना केवळ आमदार नाही तर राज्याचा मंत्री म्हणून विधानसभेत पाठवायचेय

## आ. प्रविण दरेकरांचे महाडवासियांना आवाहन

प्रतिनिधी
**महाड**

भरत गोगावले महाराष्ट्राचे लोकप्रिय नेतृत्व झालेय. रात्री अपरात्री मदतीला धावून जाणारा माणूस राज्याच्या मंत्रिमंडळात जाणार आहे. प्रभाकर मोरे ज्यावेळी राज्याचे मंत्री होते त्यावेळी विकासाची गंगा येथे वाहत होती ती नंतर थांबली. महाराष्ट्राला पुन्हा एकदा वैभव आणण्यासाठी भरत गोगावलेंना केवळ आमदार म्हणून नाही तर राज्याचा मंत्री म्हणून विधानसभेत पाठवायचे आहे असे आवाहन भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी महाडवासियांना केले. भाजपा, शिवसेना, आरपीआय महायुतीचे महाड विधानसभा क्षेत्राचे उमेदवार म्हणून आज भरत गोगावले यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.




### सुभाष देसाईंनी उदययोगमंत्री असताना किती उद्योग आणले?

*सुभाष देसाई इकडे आले होते. उद्योगमंत्री असताना ह्यांनी काय काय उद्योग केले हे काढले तर पुन्हा इकडे ते फिरकणार नाहीत. रोजगाराला रोजगार, बेरोजगाराला रोजगार देण्याची भाषा करता. राज्याचे उद्योगमंत्री असताना देसाईनी किती उद्योग आणले. महाडच्या एमआयडीसीत काय केलेत. येथील मुलांना रोजगार मिळेल असे एक काम केला असाल तर आम्ही निवडणुकीतून माघार घेऊ. याउलट भरत गोगावले गोरगरिबांच्या मुलांसाठी काम करत असतात. तुमच्या नौटंकीला महाडची जनता भीक घालणार नाही. अशी तोफही दरेकरांनी डागली.*

# आमदार रईस शेख यांचा भिवंडीमधून उमेदवारी अर्ज दाखल

प्रतिनिधी
**भिवंडी**

समाजवादी, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना महाविकास आघाडीचे 'भिवंडी पूर्व'चे उमेदवार रईस कासम शेख यांनी मंगळवारी दुपारी विधानसभा उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी केजीएन चौक ते प्रांत कार्यालयापर्यंत विशाल रॅली काढत जोरदार शक्तीप्रदर्शन केले. अयोद्धेचे समाजवादी पक्षाचे खासदार अवधेश प्रसाद यांना भेटण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

अर्ज दाखल करताना समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व आमदार अबु आझमी आणि



भिवंडीचे राष्ट्रवादीचे (शरद पवार) खासदार बाळयामामा म्हात्रे उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करताना मोठी हजेरी लावल्याबद्दल उमेदवार रईस शेख यांनी भिवंडीकरांचे आभार मानले.

# 'चिकन पीस' खाण्यावरुन मित्राची हत्या

**ठाणे**

जेवणाच्या पार्टीत चिकन पीसवरुन वाद होऊन एका मित्रानं दुसऱ्या मित्राच्या डोक्यात दगड घालून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना उल्हासनगर शहरातील कॅम्प तीनमधील काजल पेट्रोल पंप नजीक घडली आहे. याप्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी मित्राला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. धक्कादायक बाब म्हणजे उल्हासनगर पोलीस परिमंडळ 4 च्या हद्दीत पाच दिवसात ही तिसरी निर्घृण हत्या झाल्यानं शहरात एकच खळबळ उडाली आहे. मृत राजा इब्राहिम आणि आरोपी शेख हे उल्हासनगर कॅम्प नंबर तीन भागात राहत होते. दोघंही चांगले मित्र होते. रविवारी राजा इब्राहिम यानं जेवणासाठी चिकन पार्सल आणलं होतं. जेवण करण्यासाठी दोघंही काजल पेट्रोल पंप जवळ बसले. मात्र, जेवण करत असतांना चिकन पीस जास्त घेण्याच्या कारणावरुन दोघांमध्ये वाद झाला.

# प्रेमसंबंधास नकार दिल्याच्या रागातून तरुणीची निर्घृण हत्या

प्रतिनिधी
**भिवंडी**

२३ वर्षीय तरुणीने २४ वर्षीय शेजारी राहणाऱ्या तरुणास प्रेमसंबंधास नकार दिल्याच्या रागातून तरुणाने सुऱ्याने तरुणीची निर्घृण हत्या करून मोठ्या बहिणीला वाचवण्यासाठी गेलेल्या लहान बहिणीलाही सुऱ्याने वार करून गंभीर जखमी केल्याची खळबळजनक घटना सोमवारी शहरातील भादवड गावातील कानिफनाथ मंदिराजवळील कृष्णानगर मधील शत्रुघ्न तरे चाळीत घडली आहे. याप्रकरणी हत्या करणाऱ्या आरोपीच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेनंतर आरोपी फरार झाला आहे.

नितु भान सिंग (२३) असे मयत झालेल्या दुर्दैवी तरुणीचे नाव आहे.तर राजू महेंद्र सिंग (२४) असे हत्या करणाऱ्या आरोपी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपी




तरुण व मयत तरुणी मूळची उत्तर प्रदेशातील भदोई जिल्ह्यातील ग्राम नेवादा मधील असून सद्यस्थितीत कुटुंबासोबत येथील भादवड गावातील कृष्णानगर मधील भरत तरे यांच्या चाळीतील एका भाड्याच्या खोलीत राहत आहेत.याच ठिकाणी आरोपीही मयत तरुणीच्या शेजारी राहत होता.

आरोपी राजू याच्या प्रेमसंबंधास नितु हिने नकार दिला होता.याच रागातून सोमवारी राजूने नितु घरी एकटी असताना भाजी कापण्याच्या सुऱ्याने नितुच्या शरीरावर सपासप वार करून तिची निर्घृण हत्या केली. यावेळी नितुची लहान बहिण रितूने नितुला वाचवण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने रीतुच्या बोटाजवळ सुऱ्याने वार करून तिलाही जखमी केले आहे. याप्रकरणी मयत नितुच्या वडिलांच्या फिर्यादीवरून आरोपी राजूच्या विरोधात शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर पोलिसांची कुणकुण लागताच राजू घटना स्थळावरून फरार झाला असून पोलिस त्याचा सीसीटिव्हीच्या आधारे कसून शोध घेत आहेत. पुढील तपास पोलिस निरीक्षक (गुन्हे) अतुल अडुरकर करीत आहेत.

# शक्तिप्रदर्शन करत रवींद्र चव्हाण, विश्वनाथ भोईर यांचे उमेदवारी अर्ज दाखल

**डोंबिवली**

डोंबिवली, कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील महायुती, महाविकास आघाडी आणि अपक्ष उमेदवारांनी मंगळवारी शक्तिप्रदर्शन करत आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. उमेदवारांच्या मिरवणुकांमुळे कल्याण, डोंबिवलीतील मिरवणूक मार्ग वाहन कोंडीत अडकले होते.

सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून मंगळवारी शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. डोंबिवली पश्चिमेतील सम्राट चौक, दिनदयाळ रस्ता, महात्मा फुले रस्त्याने ते रेल्वे पादचारी पुलावरून स. वा. जोशी शाळेत कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसह दाखल झाले. ठाकुर्ली उड्डाण पुलावरून मिरवणूक नेण्यात आली तर पूल वाहन कोंडीत अडकेल असा विचार करून कार्यकर्त्यांनी भावे सभागृहाजवळील रेल्वे पादचारी पुलावरून नेहरू रस्त्यावर गणेश मंदिर येथे येणे पसंत केले. त्यामुळे ठाकुर्ली पुलावरील वाहन कोंडी टळली. या मिरवणुकीमुळे दिनदयाळ रस्त्यावर काही वेळ कोंडी झाली होती.

# नवी मुंबईत मतदार जागरुकतेच्या स्वीप कार्यक्रमांना वेग

प्रतिनिधी
**नवी मुंबई**

विधानसभा निवडणूक मतदार जागरुकता कार्यक्रमांतर्गत 150 ऐरोली व 151 बेलापूर या नवी मुंबईतील दोन विधानसभा मतदार संघ क्षेत्रात स्वीप कार्यक्रमांतर्गत मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. यामध्ये नमुंमपा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वीपचे नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली नागरिकांपर्यंत पोहचून त्यांना मतदान करण्याकरीता प्रोत्साहित करण्यात येत आहे.

या अनुषंगाने 150 ऐरोली विधानसभा मतदार संघात सेक्टर 17 ऐरोली येथील पोस्ट ऑफिस मध्ये स्वीप पथकाने जाउुन तेथील अधिकारी, कर्मचारी व नागरिक




यांचे मतदान करण्याविषयी प्रबोधन केले. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या राजमाता जिजाउु रुग्णालयातही डॉक्टर्स, नर्सेस, तेथील रुग्णालयीन कर्मचारी यांना भेटून मतदान विषयक जनजागृती करण्यात आली. त्याचप्रमाणे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्याशीही संवाद साधून त्यांना मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले. अशाचप्रकारे तुर्भे प्राथमिक नागरी आरोग्य केंद्रातही स्वीप पथकाने भेट देउुन डॉक्टर, नर्सेस व इतर उपस्थितांना मतदान करण्याविषयी प्रोत्साहित केले.

घणसोली स्टेशन बाहेरील रिक्शा चालकांशीही सुसंवाद साधत त्यांना मतदान करण्याविषयी आवाहन करतानाच रिक्षावर मतदानाचा संदेश असलेले स्टीकर्स लावण्याविषयी सांगण्यात आले. ऐरोली येथे फटाका विक्रीच्या तात्पुरत्या स्वरुपातील स्टॉलला भेटी देउुन स्टॉल विक्रेते व ग्राहक यांनाही मतदानाचे महत्व पटवून देण्यात आले.

अशाच प्रकारे 151 बेलापूर विधानसभा मतदार संघातही सेक्टर 25 समाजमंदिर सभागृह, जुईनगर, नेरुळ या ठिकाणी उपस्थित नागरिकांना 20 नोव्हेंबर रोजी मतदान करण्याचा आग्रह मतदानाचे महत्व सांगून करण्यात आला. त्याचप्रमाणे तुर्भे गाव सेक्टर 23 व सेक्टर 22 या ठिकाणी एनएसएस विद्यार्थ्यांची जनजागृतीपर मोठी रॅली काढण्यात आली व उपस्थितांना मतदान करण्याविषयी आवाहन करण्यात आले. सर्व ठिकाणी मतदानाची प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली.

# मतदारसंघात निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम आणि खर्च निरिक्षक सुरेंद्र पाल सिंग यांचा पाहणी दौरा

प्रतिनिधी
**भाईंदर**

आगामी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024 च्या पार्श्वभूमीवर आज दि. 29.10.2024 रोजी मा. निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम व मा. निवडणूक खर्च निरिक्षक सुरेंद्र पाल सिंग यांनी ठाणे जिल्ह्यातील 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघास प्रत्यक्ष भेट देऊन निवडणूक कामकाजाचा आढावा घेतला.

सदर भेटीत मा. निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम व मा. निवडणूक खर्च निरिक्षक सुरेंद्र पाल सिंग यांनी 145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातील निवडणूक कामकाजास्तव कार्यरत स्ट्राँग रूम, कंट्रोल रूमची पाहणी केली त्याच बरोबर एक खिडकी योजना पथक, खर्च निरिक्षक पथक, मनुष्यबळ पथक, SST / FST / VST / VVT पथक, कायदा व सुव्यवस्था पथक, 85+ व दिव्यांग पथक, स्वीप पथक, प्रसार माध्यम पथक व बॅलेट पेपर व मोर्क कॉपी पथक या पथकांची सविस्तर माहिती घेतली.



निवडणूक खर्च निरिक्षक यांनी खर्च निरिक्षक पथक व प्रसार माध्यम पथकास महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्याच बरोबर SVEEP पथकास लोकसभेपेक्षा जास्त मतदानाची टक्केवारी वाढावी या करीता विविध माध्यमातून जास्तीत जास्त मतदानाविषयी जनजागृती करणेबाबत सूचना दिल्या.

सदर भेटीप्रसंगी मा. निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम व मा. निवडणूक खर्च निरिक्षक सुरेंद्र पाल सिंग सह मिरा भाईंदर वसई विरार पोलीस उप - आयुक्त प्रकाश गायकवाड, 145 मिरा भाईंदर मतदारसंघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी निलेश गौंड, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी कल्पिता पिंपळे, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार घरात, निवडणूक नायब तहसीलदार प्रदिप मुकणे व सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

**जाहिर नोटीस**

माझे अशिल **श्री. मोहमद हुसेन अब्दुल सत्तार** झदी यांनी दिलेल्या माहितीवरुन ही जाहीर नोटीस देत आहे की, माझे अशिल खालील नमूद निवासी मिळकत मूळ भाडेकरू श्रीमती. वर्षा द्वारका भोजवानी यांचे नावावरून स्वतःच्या नावे हस्तांतरित करीत असून सदर मिळकतीबाबत जर कोणा व्यक्तीचा, संस्थेचा, बँकेचा किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार किंवा हरकत असल्यास माझ्या खालील पत्त्यावरती व मा. प्रशासकीय अधिकारी, मालमत्ता, 'एफ' नॉर्थ विभाग, म्युनिसिपल बिल्डींग, भाऊ दाजी लाड रोड, माटुंगा, मुंबई ४०० ०१९ या पत्त्यावर आपली हरकत १४ दिवसांच्या आत पुराव्यानिशी सादर करावी, अन्यथा सदरहु दावे माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचा तपशील :-**
रूम नं. ३९, तळमजला, चाळ नं. टी/७०, विश्रामवाडी, भाऊ दाजी लाड रोड, सायन, मुंबई ४०० ०२२

सही /-
**ॲड. एस. बी. शिंदे**
२/१९, म्युनिसिपल चाळ, परेल, भोईवाडा, मुंबई ४०००१२

**पश्चिम रेल्वे**
**साहित्य व्यवस्थापन विभाग**
**विविध साहित्य पुरवठा**
**ई-प्रापण जाहिरात क्र . एस/६१/२०२४ दिनांक २५.१०.२०२४**

| अ.क्र. | बाबीचे संक्षिप्त वर्णन | परिमाण | टी. ओ.डी. |
|---|---|---|---|
| ७०७ | लिड ॲसिड बॅटरी७५ एएच | ८० संच | २२ नोव्हे २४ |
| ७०८ | हाय रिच पेन्टाग्राफकरीता सुट्या भागांचा संच | ५०० संच | २५ नोव्हे २४ |
| ७०९ | इनहिबिटेड मिनरल इंस्यूलेटिंग ऑईल | ५२९५३ लिटर | २६ नोव्हे २४ |
| ७१० | लो मेंटेनन्स लिड ॲसिड बॅटरी | ७१४ नग | २७ नोव्हे २४ |

इरठे, खरेदी निर्बंध आणि तपशीलवार निविदा अटींसाठी कृपया www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. ०६७८

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

# नांदेडमध्ये लोखंडी पेट्यांमधून नेताना जप्त केली दीड कोटींची कॅश

**नांदेड :** नांदेडमधील भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत तपासणीदरम्यान एका चारचाकी वाहनातून 1 कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. बोलेरो टेम्पोची तपासणी करत असताना लोखंडी पेट्यांमध्ये ठेवलेले एक कोटी पाच लाख रुपये पोलिसांना आढळून आले. या रकमेबाबत वाहन चालकाकडे पोलिसांनी खुलासा मागितला पण वाहन चालक योग्य खुलासा देवू न शकल्यानं ही रक्कम पोलिसांनी जप्त केलीये. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कॅश सापडल्याने खळबळ उडाली आहे. याबाबत निवडणूक आयोगाला सुद्धा माहिती देण्यात आलीये.. पोलीस तपास करत आहेत. ही रक्कम कुठून आली, कुठे जात होती, हे कुणाची रक्कम आहे याबाबत आता पोलिसांचा तपास सुरू केला आहे पुणे-सातारा महामार्गावर पुणे पोलिसांनी 5 कोटींहून अधिकची रोकड जप्त केली होती. कोल्हापूरच्या दिशेने जात असलेल्या इनोव्हा गाडीतून ही रोकड पकडलीय..पैसे कुठून आले याबाबत चौकशी सुरुय..आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही कारवाई केली आहे.



## महत्त्वाचे

### कंत्राट मिळवून देण्याच्या नावाने तरुणाची फसवणूक

**जळगाव :** ऑप्टिकल फायबर टाकण्याच्या कामाचा कंत्राट मिळवून देण्याचे सांगत जामनेरच्या एका तरुणाची साडेअकरा लाखांत फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. दरम्यान पैशांची मागणी केल्यानंतर सदर तरुणास धमकी देण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमळनेरच्या विजय धनराज पाटील या तरुणाची फसवणूक झाली आहे. अमळनेरमध्ये व्यंकटेश इंटरप्रायझेस नावाची फर्म असून १५ ऑगस्ट २०२० ला सायंकाळी पाच वाजता त्यांच्या ओळखीचे जामनेर येथील राहुल दत्तात्रय चव्हाण, सागर दत्तात्रय चव्हाण या दोघांनी विजयच्या घरी आले. त्यांनी विजयला ऑप्टिकल फायबर कंत्राट देतो, असे सांगून १५ लाख रुपयांची मागणी केली. त्यानुसार विजय याने टप्प्याटप्प्याने ११ लाख ५० हजार रुपये दिले.

### नांद्री येथे घरफोडी

**खामगाव :** तालुक्यातील नांद्री येथील एका मेंढपाळाची पत्नी बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने असा एकुण १ लाख ४२ हजार रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना २७ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली. विशेष म्हणजे एक महिन्यापूर्वी याच गावात चोरीची घटना घडली होती. परंतु या चोरीची त्या घरमालकाने तक्रार दिली नव्हती. तक्रार न देण्यामागे मागचे कारण मात्र समजू शकले नाही. तालुक्यातील नांद्री येथील विलास गोटीराम हटकर वय ४० हे आपल्या मेंढ्या घेवून बाळापूर तालुक्यातील व्याळा येथील वाड्यावर राहत आहे. तर त्यांची पत्नी गुंठाबाई ही एकटीच नांद्री येथील घरी राहते. २६ ऑक्टोबर रोजी गुंठाबाई ही दुपारी एक वाजेच्या सुमारास घराला कुलूप लावून बाहेरगावी गेल्या होत्या. हीच संधी साधून अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर चोरट्यानी घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले रोख ३० हजार रुपये, ५ सोन्याच्या अंगठ्या, २ मंगळसुत्र, २ एकदानी असा एकूण १ लाख ४२ हजार रुपयाचा ऐवज चोरुन नेला. करण हटकर यांना २७ ऑक्टोबर रोजी चोरीची ही घटना सकाळी लक्षात आली. त्यांनी तात्काळ घर मालक विलास हटकर यांना या घटनेची माहिती दिली.

# अंतरवालीत धर्मगुरुंचे हेलिकॉप्टर उतरवण्यास नाकारली परवानगी

प्रतिनिधी
■ जालना



विधानसभा निवडणूक 15 ऑक्टोबरला जाहीर झाली. मात्र निवडणुकीला खरी रंगत आता ऑक्टोबरच्या शेवटी येत आहे. आज (मंगळवार) उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख होती. महायुती, महाविकास आघाडी, मनसे, वंचित, रासप, एमआयएम, परिवर्तन महाशक्ती आणि अपक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यासोबतच मनोज जरांगे यांच्या उमेदवारांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहे. एमएमडी हा फॉर्म्यूला घेऊन मनोज जरांगे 30 ऑक्टोबरला त्यांची भूमिका स्पष्ट करणार होते, मात्र आता त्यांनी त्यांची बैठक एक दिवस पुढे ढकलली आहे.

मनोज जरांगे फॅक्टरमुळे महायुती आणि महाविकास आघाडी या प्रमुख दोन्ही आघाडीमध्ये धाकधूक आहे. मनोज जरांगे यांनी सध्या एमएमडी अर्थात मराठा, मुस्लिम व दलित समीकरण जुळवण्याचे प्रयत्न सुरु केले आहे. त्यासाठी आज त्यांची मराठा, मुस्लिम आणि दलितांच्या प्रतिनिधींसोबत बैठक होती. मात्र प्रशासनाने आज अंतरवाली सराटीत हेलिकॉप्टर उतरवण्यास परवानगी दिली नाही. त्यामुळे काही धर्मांचे प्रतिनिधी आणि धर्मगुरु येऊ शकले नाही. त्यांना उद्याचीही परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे आता 31 ऑक्टोबर रोजी अंतिम बैठक घेणार आहेत. त्या बैठकीत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काय भूमिका घ्यायची याचा निर्णय होणार आहे. तसेच मनोज जरांगे यांनी मराठा समाज बांधवांना 31 ऑक्टोबर रोजी अंतरवालीमध्ये न येण्याची विनंती केली आहे.

## जरांगेंची पुढील बैठक 31 ऑक्टोबरला

यावेळी माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीसांवर निशाणा साधला. ते म्हणाले की, त्यांची वृत्ती चूक मान्य न करण्याची आहे. त्यांनी मला बोलायची काही गरज आहे का? आम्ही त्यांना आमचे विरोधक किंवा शत्रू मानत नाही. मात्र आमच्यावर खोट्या केसेस केल्या जातात. आमच्याविरोधात एसआयटी नेमली जाते. सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी होऊ दिली जात नाही. आम्ही काही चूक करत नाही, तुम्ही चूक केली आहे. आंदोलनाची दखल घ्यायची नाही, गुरमीत बोलायचे, तुमची भाषा कशी आहे. आम्हाला खुन्नस द्यायची, या सगळ्याचा हिशेब आता लोक करणार आहेत असा इशारा मनोज जरांगे यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिला.

# शरद पवारांनी केली अजित पवारांची नक्कल

प्रतिनिधी
■ बारामती



बारामती विधानसभा मतदारसंघातील निवडणूक यावेळी चांगलीच चर्चेचा विषय ठरली आहे. अजित पवार विरुद्ध पुतण्या युगेंद्र पवार अशी लढत होत आहे. यात अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर आरोप केले होते. त्याला उत्तर देताना शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. इतकेच नाही तर अजित पवार यांची नक्कल करत शरद पवार यांनी डोळ्यावरील चष्मा काढला, तसेच डोळे देखील पुसले. त्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

युगेंद्र पवार हे पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करायला शरद पवार स्वतः उपस्थित होते. त्यानंतर आज त्यांच्या प्रचारासाठी शरद पवार यांच्या सभेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या सभेत शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार निवडणुकीला उभ्या होत्या. त्यावेळी शरद पवार येतील आणि भावनिक आवाहन करतील, असे

## चश्मा काढला, डोळेही पुसले

त्यांनी म्हटले होते. मात्र आता ते भावनिक बोलत असल्याची टीका शरद पवार यांनी केली आहे. इतकेच नाही तर या वेळी बोलताना शरद पवार यांनी अजित पवार यांची नक्कल देखील केली.

काही लोकांनी आमच्यावर खटला केला. आयुष्यात ती कधीही कोर्टात उभा राहिलो नव्हतो. मात्र त्यांच्यामुळे मला त्याला सामोरे जावे लागले. माझ्या नावाने समन्स आले. मला घर फोडायला कोणीही शिकवले नसल्याचे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. बारामती विधानसभा मतदारसंघात होणारी पवार विरुद्ध पवार निवडणूक आता चांगलीच चर्चेचा विषय ठरली आहे. अजित पवार यांनी केलेल्या सर्व आरोपांना शरद पवार यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे.

# 'प्रहार'चा प्रदेशाध्यक्ष फोडला, भाजपचे अशोक ओळंबे बच्चू कडूंच्या गळाला

प्रतिनिधी
■ अकोला

विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर आज उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. मात्र त्याआधीच मोठ्या राजकीय घडामोडी घडताना दिसत आहेत. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात मुख्य लढत होत असली तरी परिवर्तन महाशक्ती ही तिसरी आघाडीसुद्धा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात आहे. तिसऱ्या आघाडीतील बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचा प्रदेशाध्यक्ष भाजपाने फोडला. पण आता अकोल्यातील भाजपाचा बडा मासा बच्चू कडूंच्या गळाला लागला आहे.

महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोन्ही सरकारमध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू हे सामील होते. मात्र



मंत्रिपदावरून मतभेद झाल्यानंतर बच्चू महायुतीमधून बाहेर पडले. यानंतर लोकसभा निवडणुकीवेळी नवनीत राणा यांना उमेदवारी दिल्यामुळे ते नाराज होते. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वेगळी चूल मांडली. संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी यांच्यासोबत मिळून त्यांनी परिवर्तन महाशक्ती ही तिसरी आघाडी निर्माण केली. मात्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने प्रहार जनशक्ती पक्षाचा प्रदेशाध्यक्षच फोडला. प्रहारचे प्रदेशाध्यक्ष अनिल गावंडे हे बच्चू कडूंची साथ सोडत भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. मात्र या घडामोडी घडत असतानाच बच्चू कडू यांनी भाजपालाच धक्का दिला.

8 वर्ष अकोला शहराध्यक्ष राहिलेले आणि सध्या प्रदेश कार्यकारणी सदस्य असलेले भाजपाचे अशोक ओळंबे यांनी प्रहारमध्ये प्रवेश केला आहे. अशोक ओळंबे हे आज विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. तर दुसरीकडे भाजपाने माजी शहराध्यक्ष विजय अग्रवाल यांना अकोल्यातून तिकीट दिले आहे.

# संगमनेर विधानसभेतून सुजय विखेंचा पत्ता कट

## वादग्रस्त वक्तव्यामुळे वातावरण शांत करण्यासाठी महायुतीचा निर्णय

प्रतिनिधी
■ संगमनेर

लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव भाजपाचे माजी खासदार सुजय विखेंच्या चांगलाच जिव्हारी लागला होता. त्यामुळं विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर होण्यापूर्वीच त्यांनी बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात प्रचाराला सुरुवात केली होती. मात्र, असं असतानाच संगमनेरची जागा शिवसेनेच्या वाटेला गेल्यानं विधानसभा निवडणूक लढवण्याचं सुजय विखे यांचं स्वप्न भंगलंय.

यासंदर्भात प्रसार माध्यमांशी संवाद साधत असताना सुजय विखे म्हणाले की, "संगमनेरची जागा भाजपाला मिळावी यासाठी आम्ही अखेरपर्यंत प्रयत्न केला. मात्र, ही जागा अगदी शेवटच्या दिवशी जाहीर करण्यात आली. नगर जिल्ह्यातील कोणती जागा



कोणाला जाईल यावरुन गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. महाराष्ट्रात 8 ते 10 जागा शेवटच्या टप्प्यात उरल्या होत्या. या जागांविषी वरच्या स्तरावर वाटाघाटी झाल्या. त्यानंतर संगमनेर मतदारसंघाची जागा शिवसेनेला देण्यात आली."

पुढं ते म्हणाले, "शिवसेनेकडून अमोल खताळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आलीय. त्याचं वैशिष्ट्य असं आहे की, मागील पाच वर्षात त्यांनी सर्वसामान्य जनतेची अनेक कामे केलीत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रस्थापितांना मॅनेज न होणारा उमेदवार आम्ही या जागेवरुन दिलाय. एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा काय करून दाखवू शकतो? हे आता 23 तारखेलाच कळेल", असं सुजय विखे म्हणाले.

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ गावात शुक्रवारी (25 ऑक्टोबर) सुजय विखे यांची सभा झाली. या सभेदरम्यान भाजपाचे ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख यांनी बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यांच्या वक्तव्यानंतर कॉंग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं होतं. तसंच सुजय विखे आणि वसंतराव देशमुख यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणीही कार्यकर्त्यांकडून करण्यात आली.

# रत्नागिरीत भाजपला एकही जागा नसल्याने पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारी यादी जाहीर झाल्या असून त्यांच्या उमेदवारांनी आज अर्ज देखील दाखल केले. उमेदवारी यादी जाहीर झाल्यानंतर अनेक राजकीय पक्षांच्या नेते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी पाहायला मिळाली. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये नाराजीनाट्य पाहायला मिळाले. त्यामुळे अनेकांनी बंडखोरी केली तर काहींनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. अशातच रत्नागिरीत एकही जागा न मिळाल्याने भाजपमध्ये नाराजी आहे. गुहागर मतदारसंघावर भजपने दावा केला होता. मात्र शेवटच्या यादीत देखील भाजपला स्थान मिळाले नाही.

गुहागरमधून विनय नातू भाजपकडून इच्छुक उमेदवार होते. शिवसेनेच्या शेवटच्या यादीमध्ये गुहागर विधानसभा मतदारसंघ भाजपला न सुटल्याने विनय नातू नाराज आहेत. साम टीव्हीशी संवाद साधताना नाराज विनय नातू यांनी सांगितले की, 'भाजपला जिल्ह्यात एकही जागा न मिळाल्याने पुढच्या दृष्टीने खूप कठीण आहे. बाळ मानेंसारखा कार्यकर्ता जाणं म्हणजे खूप मोठे दुःख होतं. आपला जेव्हा आमदार नसतो तेव्हा संकटनात्मक अडचणी या वाढत असतात. मी नाराज असलो तरी महायुतीचे काम करणार आहे.

तसंच,'४० वर्षे काम करणाऱ्या बाळ मनाचा संयम सुटतो तर पुढच्या काळात कार्यकर्त्यांचं काय होईल हे सांगता येत नाही. जागा वाटपाचा फॉर्मुला जिल्ह्यात सोयीस्करित्या बनवला जातो. महाराष्ट्रासाठी जागावाटपाचा फॉर्म्युला वेगळा असतो. या जागा वाटपाचा रत्नागिरी जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे.', असे मत विनय नातू यांनी व्यक्त केले आहे.

# नांदेडच्या पोटनिवडणुकीतून एमआयएमची माघार - जलील

■ संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरचे एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी नांदेड पोटनिवडणुकीतून माघार घेतली आहे. एमआयएम नांदेडची पोटनिवडणूक लढणार नसल्याचं यावेळी त्यांनी स्पष्ट केलं आहे.

नांदेड लोकसभेची पोटनिवडणूक लढवण्यात स्वत: एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील आग्रही होते. मात्र आता त्यांनी नांदेडच्या पोटनिवडणुकीतून माघार घेतली असल्याचं जाहीर केलं आहे. एमआयएम ही पोटनिवडणूक लढणार नसल्याचं त्यांनी म्हंटलं आहे. आता आमचं लक्ष हे विधानसभेच्या जागांवर आहे. पूर्ण ताकदीने आम्ही विधानसभा लढवू, असंही त्यांनी म्हंटलं आहे. नांदेडच्या निवडणुकीवरून आम्ही लक्ष काढून घेतलं आहे. विधानसभेला असलेल्या आमच्या १४-१५ जागांवर आता आम्ही लक्ष केंद्रित केलं आहे. त्यामुळे आम्ही आमची सर्व ताकद आता विधानसभा निवडणुकीत लावू, असं यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना जलील यांनी म्हंटलं आहे.

# ज्येष्ठ लेखिका प्रा. वीणा देव यांचे निधन

■ पुणे

लेखन, संकलन, संपादन असे साहित्य प्रकार लीलया हाताळून अभिवाचनाच्या माध्यमातून अभिजात साहित्याच्या प्रचारामध्ये योगदान देणाऱ्या ज्येष्ठ लेखिका आणि मराठीच्या विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका डॉ. वीणा देव (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी निधन झाले. त्या ज्येष्ठ लेखक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या होत. त्यांच्यामागे प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी



यांच्यासह दोन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

गोनीदा यांच्यामुळे वीणा देव यांच्यावर घरातच मराठी भाषा आणि साहित्याचे संस्कार झाले. शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी ३२ वर्षे अध्यापन कार्य केले. विभागप्रमुख म्हणून त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या. 'मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे' या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी पीएच. डी. संपादन केली होती. पती डॉ. विजय देव, मृणाल आणि मधुरा या कन्या आणि जावई रुचिर कुलकर्णी यांच्यासमवेत वीणा देव यांनी गो. नी. दांडेकर यांच्या कादंबऱ्यांच्या अभिवाचनाचे साडेसहाशेहून अधिक प्रयोग केले.

# लातूरमध्ये भाजपला खिंडार

## माजी खासदार सुधाकर शृंगारे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश



प्रतिनिधी
■ लातूर

लोकसभेच्या पराभवानंतर भाजपमधून नॉट रिचलेबल झालेले माजी खासदार सुधाकर शृंगारे यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत आज काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. शृंगारे काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपला मोठा धक्का बसला आहे.

माजी मंत्री तथा लातूर शहराचे आमदार अमित देशमुखआणि धीरज देशमुख यांच्या प्रचार शुभारंभ सभेवेळी भाजपला सोडचिट्टी देत आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शृंगारे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे ऐन विधानसभेच्या तोंडावरच लातूर जिल्ह्यात भाजपाला मोठ खिंडार पडले आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सुधाकर शृंगारे यांनी विजय मिळवला होता. यानंतर मुद्दा झालेल्या लोकसभा निवडणुकीत देखील भाजपकडून त्यांना संधी देण्यात आली होती. मात्र सुधाकर शृंगारे यांचा काँग्रेसचे डॉ. शिवाजी काळे यांनी पराभव केला होता. लोकसभा निकालानंतर भाजपमधून नॉटरीचेबल झालेले उदगीर राखीव विधानसभा मतदारसंघातून भाजपकडून इच्छुक होते. मात्र त्या ठिकाणची जागा महायुतीत राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे आली.

# शेवटच्या दिवशी थोरात, विखे आणि बावनकुळेंनी भरला अर्ज





प्रतिनिधी
■ नगर / नागपूर

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आज उमेदवारी अर्ज दाखल केला. ते संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. संगमनेर या त्यांच्या मतदार संघात गेल्या काही दिवसांमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस असा संघर्ष दिसून येत आहे. यात काही गाड्यांची जाळपोळ देखील करण्यात आली होती. त्यामुळे या मतदारसंघाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे गटात बंडखोरी दिसून आली. माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी जिल्हाप्रमुख व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने अभिषेक कळमकर यांना उमेदवारी दिली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या आधी त्यांनी मोठे शक्तीप्रदर्शन केले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही उपस्थिती होती. माढा मतदारसंघातून अभिजीत पाटील, मुलुंड मधून संगीता वाजे, मोर्शीत गिरीश काळे यांना शरद पवार यांच्या पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. शिर्डी विधानसभा मतदारसंघात भाजपकडून राधाकृष्ण विखे पाटील दुस-यांदा अर्ज दाखल केला. यापूर्वी एक अर्ज दाखल केला होता. शक्तिप्रदर्शन करत. श्रीरामपुर विधानसभा मतदारसंघात कॉंग्रेसकडून हेंमत ओगले तर शिवसेना शिंदे गटाकडून भाऊसाहेब कांबळे शक्तिप्रदर्शन करत अर्ज भरला. मनसेकडून राजेंद्र कापसे , तिस-या आघाडीकडून दीपक त्रिभुवन यांनी देखील अर्ज केला.

# प्रेयसीला पुलावरून ढकलून देत पसार झालेल्या तरुणाला अटक

प्रतिनिधी
■ देवरुख

सोने-चांदीचे दागिने, दोन मोबाइल चोरण्याच्या उद्देशाने प्रेयसीला भातगाव पुलावरून पाण्यात ढकलून देत तिची दुचाकी घेऊन पळालेल्या आरोपीच्या संगमेश्वर पोलिसांनी मुसक्या आवळल्या. नितीन गणपत जोशी (वय २७, मूळ रा. पाचेरीसडा, ता. गुहागर, सध्या रा. नालासोपारा, ता. वसई, जि. पालघर) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून ४ लाख ५६ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही घटना २२ ऑक्टोबरला रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली. नितीन जोशी याने मूळ गावी आपले काम असून, त्या ठिकाणी जायचे आहे, असे प्रेयसीला सांगितले. ती तरुणी आपल्याकडील सोने-चांदीचे दागिने, दोन मोबाइल व तिच्या भावाने तिच्याकडे ठेवलेली दुचाकी घेऊन नितीनबरोबर नालासोपारा येथून २१ ऑक्टोबरला रात्री ट्रॅव्हल्सने निघाले. ते दि. २२ रोजी गुहागर परिसरात आले. तेथे नितीनने तरुणीची एका हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली आणि तो त्याच्या घरी निघून गेला. सायंकाळच्या सुमारास भातगाव पुलावर मित्र भेटायला येणार आहे. त्याला भेटून नालासोपारा येथे परत जाऊ, असे नितीनने प्रेयसीला सांगितले. नितीन तरुणीला दुचाकीने भातगाव पुलावर घेऊन गेला. रात्री आठच्या सुमारास नितीनने तरुणीला भातगाव पुलाच्या कठड्यावरून पाण्यात फेकले. त्यानंतर सोने, चांदीचे दागिने असलेली पर्स, मोबाइल व दुचाकी घेऊन पोबारा केला. पुलाजवळ असणाऱ्या कामगारांनी प्रेयसीला वाचविले होते. प्रेयसीने नितीन जोशीविरुद्ध फिर्याद दिली होती. याप्रकरणी नितीन जोशी याला नालासोपारा येथे सापळा रचून ताब्यात घेतले.

# पवार विरुद्ध पवार लढाई, अभिजीत बिचुकलेंची उडी

प्रतिनिधी
■ बारामती

राज्यातील बारामती विधानसभा मतदारसंघ सध्या चर्चेत आहे. या मतदारसंघामध्ये पवार विरुद्ध पवार फाइट पाहायला मिळत आहे. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अजित पवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून युगेंद्र पवार निवडणूक लढवत आहे. बारामतीत काका विरुद्ध पुतण्यांमध्ये लढत होणार आहे. यामध्ये आता बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले यांनी उडी घेतली आहे. अभिजीत बिचुकले बारामतीमधून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, 'बिग बॉस' फेम अभिजीत बिचुकले यंदा बारामतीमधून निवडणूक लढवणार आहेत. अभिजीत बिचुकले यांनी आज बारामतीतून उमेदवारी अर्ज दाखल केला. पवार विरुद्ध पवार



लढाईमध्ये अभिजीत बिचुकले यांनी उडी घेतल्यामुळे चर्चा सुरू झाली आहे. बारामतीमध्ये तिहेरी लढत पाहायला मिळणार आहे. याआधी अभिजीत बिचुकले यांनी मुंबईतील वरळी, पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आहे.

अभिजीत बिचुकले कायम चर्चेत असतात. बिग बॉस मराठीमध्ये सहभागी झाल्यापासून ते जास्त चर्चेत आहेत. अभिजीत बिचुकलेंनी २०१९ मध्ये वरळी विधानसभा निवडणूक आदित्य ठाकरे यांच्याविरोधात लढवली होती. त्यांनी कसबा पेठ विधानसभेची पोटनिवडणुक देखील लढवली होती. पंढरपूर-मंगळवेढा निवडणूक देखील त्यांनी लढवली होती. २०२४ ची लोकसभा निवडणूक त्यांनी कल्याणमधून श्रीकांत शिंदेविरोधात लढवली होती.

अभिजीत बिचुकले यांनी आतापर्यंत अनेक निवडणूक लढवल्या. पण ते विजयी झाले नाही. त्यांना एकाही निवडणुकीमध्ये यश आले नाही. पण निवडणुकीमध्ये उभं राहणे, आरोप करणं आणि प्रचाराच्या माध्यमातून ते चांगलेच चर्चेत राहिले. त्यांनी नेहमीच ज्या मतदारसंघात उभे राहिले त्याठिकाणी उभे राहिलेल्या इतर पक्षांच्या उमेदवारांना चॅलेज दिले.

## ऑस्ट्रेलियन फलंदाज मॅथ्यू वेडची निवृत्ती

**मेलबर्न :** बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी भारतीय संघाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी मॅथ्यू वेडने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. ८ महिन्यांपूर्वी या वर्षी मार्चमध्ये, त्याने शेफिल्ड शील्डची अंतिम फेरी खेळल्यानंतर प्रथम श्रेणी म्हणजेच रेड बॉल क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती.मॅथ्यू वेडने या वर्षीच्या टी २० विश्वचषकात भारताविरुद्ध ऑस्ट्रेलियाकडून शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर तो आपल्या कोचिंग कारकिर्दीला सुरुवात करणार आहे. पाकिस्तानविरुद्धच्या घरच्या टी-२० मालिकेसाठी त्याचा कोचिंग स्टाफमध्ये समावेश करण्यात आला आहे. तो विकेटकीपिंग आणि क्षेत्ररक्षण प्रशिक्षकाची भूमिका बजावणार आहे.वेडने आपल्या १३ वर्षांच्या कारकिर्दीत ऑस्ट्रेलियासाठी 36 कसोटी सामने, ९७ वन-डे आणि ९२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.



## प्रतीक तुलसानीचे दुहेरी यश

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाण्याच्या प्रतीक तुलसानीने राष्ट्रीय पातळीवर सलग दोन अजिंक्यपद मिळवत आपली छाप पाडली आहे. प्रतीकने गोव्यात झालेल्या १३ वर्षखालील मुलांच्या यूटीटी राशयात्री मानांकन टेबल टेनिस आणि त्यानंतर लगेचच हिमाचल प्रदेशमध्ये झालेल्या १३ वर्षाखालील मुलांच्या राष्ट्रीय अजिंक्यपद सरशी मिळवली विशेष म्हणजे या दोन्ही स्पर्धा प्रतिकने अंतिम फेरीत बंगालच्या हिमोनकुमार मोंडलला नमवून जिंकल्या आहेत.

गोव्यातील मनोहर पर्रीकर इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या यूटीटी राष्ट्रीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत प्रतिकने निर्णायक लढतीत हिमोनचा ११-७,११-४,११-७ असा सरळ तीन गेममध्ये पराभव करत आपले पहिले राष्ट्रीय विजेतेपद मिळवले. त्यानंतर प्रतिकने अवघ्या १० दिवसांच्या फरकाने या यशाची पुनरावृत्ती साधताना कोरा येथे झालेल्या १३ वर्षवयोगटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आपले वर्चस्व राखले. या स्पर्धेच्या विजेतेपदाच्या होमोनकुमार विरुद्धच्या लढतीत पहिले दोन गेम प्रतिकने ११-८,११-६ असे सहज जिंकले. तिसऱ्या गेममध्ये हिमोनकुमारने तिसऱ्या गेममध्ये



चांगली झुंज देत सामन्यात पुनरागमन करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पण या गेममध्ये प्रतिकने १३-११ अशी सरशी मिळवत गेमसह सामना आणि विजेतेपदही आपल्या खिशात टाकले.

प्रतिकने वयाच्या सातव्या वर्षांपासून केवळ हौस म्हणून चंद्रकांत माईणकर आणि यश सोळंकी यांच्या मार्गदर्शनाखाली टेबल टेनिस खेळण्यास सुरुवात केली.त्यांनतर राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाल्यावर मात्र प्रतिकने गांभीर्याने खेळण्यास सुरुवात केली. सी पी गोयंका इंटरनॅशनल स्कुलचा विद्यार्थी असणाऱ्या प्रतिकने त्यानंतर पीआरओ टेबल टेनिस अकॅडमीत राजेंद्र सावंत आणि निलेश पंदिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत ठाणे जिल्ह्यासह विविध राज्य आणि अखिल भारतीयस्तरीय स्पर्धामध्ये आपल्या नावाची दखल घ्यायला लावली आहे..

## सुवर्ण महोत्सवी राज्य कुमार व मुली खो-खो स्पर्धा
## धाराशिव, सोलापूर, सांगली दोन्ही गटात उपांत्य फेरीत

प्रतिनिधी
■ धाराशिव

सुवर्ण महोत्सवी ५० वी कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत यजमान धाराशिवसह सोलापूर व सांगली या जिल्ह्याच्या कुमार व मुली संघांनी दोन्ही गटात उपांत्य फेरीत प्रवेश केला. कुमार गटात पुणे व मुलींच्या गटात गटात ठाणे जिल्ह्यानेही उपांत्य फेरी गाठली.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत कुमार गटात पुणे विरुद्ध ठाणे हा सामना वगळता तिन्ही सामने एकतर्फी झाले. पुण्याने ठाण्याचा १४-१२ असा दोन गुण चार मिनिटे राखून पराभव केला. भावेश माशेरे (२.२०, १.१० मि. व ३ गुण) व विलास मालुसरे (२.२०, १.४०मिनिटे संरक्षण ) हे त्यांच्या विजयाचे शिल्पकार ठरले. ठाण्याच्या आशिष गौतम (१.२०,२.००मि. व २ गुण ) याची लढत अपुरी पडली

दुसऱ्या सामन्यात सोलापूरने अहिल्यानगरवर ११-९ असा एक डावाने दणदणीत विजय मिळविला. त्यांच्या सुजित मेटकरी (३,१.१० मि.व २ गुण ) व फराज शेख (१.५० मि. ३ गुण)यांनी अष्टपैलू खेळी केली.

### पुणे व ठाणेही उपांत्य फेरीत लढतील



**पिछाडीवरून सोलापूरची नाशिकवर मात**

*मुलींच्या गटात नाशिक विरुद्ध सोलापूर हा सामना अत्यंत चूरशीचा झाला. मध्यंतराच्या ४-७ अशा पिछाडीवरून सोलापूरने १३-९ अशी चार गुणांनी बाजी मारली. पहिल्या डावात एका मिनिटात बाद झालेल्या स्नेहा लामकाने हिने दुसऱ्या डावात पाच मिनिटे संरक्षणाचा किल्ला लढविला. तिने आपल्या धारदार आक्रमणात पाच गडीही टिपले. कर्णधार साक्षी देठे (२, २.२० मि. व २ गुण) हिनेही अष्टपैलू खेळ करीत तिला साथ दिली. नाशिककडून सुषमा चौधरी हिने (२,२.३०मि. व नाबाद ५० सेकंद) लढत दिली.*

कर्णधार कृष्णा बनसोडेने(३.२० व २.४० मि.) संरक्षणाची शानदार खेळी केली. अहिल्यानगरकडून अनेक वाल्हेकर (२.१० मि.) व कृष्णा कपनर (४) यानी लढत दिली.

तिसऱ्या सामन्यात सांगलीने नाशिकवर ११-८ अशी डावाने एकतर्फी मात केली. सांगलीकडून अथर्व पाटील याने (२.४० मि. व २गुण )अष्टपैलू खेळ केला. प्रज्वल बनसोडे व सुजल माने यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. नाशिककडून म्हणून वाळवणे (१.४० मि. २ गडी) याचे प्रयत्न अपुरे पडले.

चौथ्या सामन्यात हरद्या वसावेच्या अष्टपैलू खेळामुळे धाराशिवने मुंबईचा १५-६ असा डावाने धुव्वा उडविला. त्याने पहिल्या डावात ३.३० मि. नाबाद व दुसऱ्या डावात १.४० मिनिटे संरक्षण करीत आक्रमणात चार गडी बाद केले. विलास वळवी याने चार मिनिटे पळती करीत संरक्षणाची बाजू सांभाळली. मुंबईकडून श्रेयस सौंदलकर (१.२०मि.) व सुजल शिंत्रे (१.१० मि.) हे वगळता त्यांचा एकही खेळाडू मैदानावर तग धरू शकला नाही.मुलींच्या गटातील दुसऱ्या सामन्यात धाराशिवने रत्नागिरीवर १४-७ असा डावाने विजय मिळवला. अश्विनी शिंदे हिने ४ तर सुहानी धोत्रे हिने २.२० मि. पळती केली. सुहानीने आपल्या धारदार आक्रमणात पाच गडीही टिपले. रत्नागिरीकडून रिद्धी चव्हाण हिने १.३० मि. पळती व दिव्य पालवेने तीन गडी बाद केले.

तिसऱ्या सामन्यात ठाण्याने मुंबई उपनगरला ९-६ असे एका डावाने नमवले. धनश्री कंक हिने चार मिनिट व सांगवी तळवडेकर हिने नाबाद १.३० मिनिटे पळती करीत तीन गडी बाद केले. मुंबई उपनगरच्या दिव्या गायकवाड हिने १.५० मि. संरक्षण व सिया भद्रिकेने तीन गडी बाद केले.

चौथ्या सामन्यात सांगलीने पुण्यास ९-५ असे डावाने हरवले. अष्टपैलू खेळी करणारी प्रतीक्षा बिराजदार ही त्यांच्या विजयाची शिल्पकार ठरली. तिने दोन्ही डावात ४ मिनिटे संरक्षण करीत चार गडी बाद केले. पुण्याकडून अक्षरा ढोले १ व १.३० नाबाद अशी संरक्षणाची खेळी केली.

## विल्यमसन तिसऱ्या कसोटीतही खेळणार नाही; इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतून परतणार

### श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत दुखापत झाली होती

प्रतिनिधी
■ मुंबई

न्यूझीलंडचा फलंदाज आणि माजी कर्णधार केन विल्यमसन भारताविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील शेवटच्या कसोटी सामन्यातही खेळणार नाही. कंबरेच्या दुखापतीमुळे विल्यमसनचे पुनर्वसन सुरू आहे. न्यूझीलंड संघाने पहिले दोन सामने जिंकून मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरी कसोटी १ नोव्हेंबरपासून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवली जाणार आहे. न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाच्या वतीने माहिती देताना, विल्यमसन भारताविरुद्ध मुंबईत होणाऱ्या तिसऱ्या कसोटी सामन्यात भाग घेणार नसल्याचे सांगण्यात आले.पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये न्यूझीलंडने मालिकेत २ -० ने आघाडी घेत मालिकेवर कब्जा केला आहे.

विल्यमसन इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतून मायदेशात परत येऊ शकतो. २८ नोव्हेंबरपासून न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे.न्यूझीलंडचे मुख्य प्रशिक्षक गॅरी स्टीड म्हणाले की, विल्यमसन बरा होत आहे, परंतु अद्याप आमच्यासोबत येण्यास तयार



नाही. न्यूझीलंडमध्ये राहणे आणि त्याच्या पुनर्वसनाच्या अंतिम भागावर लक्ष केंद्रित करणे हे त्याच्यासाठी सर्वोत्तम आहे, जेणेकरून तो इंग्लंड मालिकेसाठी तंदुरुस्त राहू शकेल असे आम्हाला वाटते. प्रशिक्षक पुढे म्हणाले की, इंग्लंड मालिकेला अजून एक महिना बाकी आहे. अशा परिस्थितीत त्याला सावरण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल.

विल्यमसन नुकताच श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान जखमी झाला होता. पुनर्वसनासाठी तो न्यूझीलंडला परतला. भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत तो पुनरागमन करेल, अशी आशा संघाला होती. विल्यमसनने भारतात खेळल्या गेलेल्या ८ कसोटी सामन्यांमध्ये ३३.५३ च्या सरासरीने धावा केल्या आहेत. तो फिरकी गोलंदाजांविरुद्ध कसलेला फलंदाज मानला जातो.

**न्यूझीलंडने ६९ वर्षांनंतर प्रथमच भारतीय भूमीवर कसोटी मालिका जिंकली**

*न्यूझीलंडने ६९ वर्षांनंतर पहिल्यांदाच भारतीय भूमीवर भारताकडून कसोटी मालिका जिंकली आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात पहिली कसोटी १९५५ मध्ये खेळली गेली होती. पहिल्या बंगळुरू कसोटीत न्यूझीलंडने टीम इंडियाचा ८ विकेट राखून पराभव करून ३६ वर्षांनंतर भारतात कसोटी सामना जिंकला. पुण्यात झालेल्या दुसऱ्या कसोटीत भारताचा ११३ धावांनी पराभव झाला.*

## शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते संघटक प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाल यांचे निधन

■ सोलापूर

शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते संघटक व ज्येष्ठ नगरसेवक प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाल (वय 82) यांचे मंगळवारी २९ ऑक्टोबर रोजी सकाळी सहाच्या सुमारास पद्मा नगर येथील निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झालं. प्रा. डॉ. पुंजाल यांच्या पश्चात पत्नी, तीन विवाहित मुली, जावई व नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या



पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले

प्रा. डॉ. पुंजाल हे हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयामध्ये फिजिकल डायरेक्टर म्हणून अनेक वर्ष सेवेत होते. 1975 मध्ये प्रथम ते सोलापूर महानगरपालिकेवर निवडून आले. यानंतर 1975, 1985, 1992, 2002, 2012 असे पाच वेळा ते निवडून आले. 1997 आणि 2012 असा दोन वेळा त्यांचा पराभवही झाला होता. स्थायी समिती सभापती पद याचबरोबर 1980 ची सत्ता पालिकेत असताना ते महापौर म्हणून निवडून आले.प्रा. डॉ. पुंजाल यांनी आपल्या कारकिर्दीत पालिकेच्या माध्यमातून अनेक विकासात्मक काम केली त्याचं नाव आजही घेतलं जातं. मार्कंडेय जलतरण तलाव, गणेश पेठ शॉपिंग सेंटर शुभराय आर्ट गॅलरी, पार्क स्टेडियम सुधारणा अशा कामांचा समावेश आहे.

सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे ते अनेक वर्ष पदाधिकारी होते. याशिवाय सोलापूर जिल्हा क्रीडा महासंघ, जिल्हा फुटबॉल संघटना, जिल्हा हँडबॉल संघटना सचिव व अध्यक्ष आणि विविध क्रीडा संस्थांशी त्यांचा मार्गदर्शक म्हणून संपर्क होता.

## महाराष्टात मनसेच्या विजयाची सुरुवात विक्रोळीपासून होणार - विश्वजित ढोलम

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्रात २००९ साली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने विधानसभेत अभूतपूर्व यश मिळविले होते व या यशाची सुरुवात विक्रोळी मतदारसंघातून झाली होती व याचीच पुनरावृत्ती करण्यासाठी मनसेचे १५६ विक्रोळी मतदारसंघातील उमेदवार विश्वजित शंकर ढोलम यांनी मनसेचे ते सोनेरी दिवस पुन्हा आणण्याचा संकल्प करून आज उमदेवारीचा फॉर्म भरला.

कन्नमवार नगर नंबर १ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करून मनसे शाखा ते टागोर नगर येथेही निवडणूक कार्यालयापर्यंत हजारो कार्यकर्त्यांच्या सोबत रॅली काढून शक्तिप्रदर्शन केले. या रॅलीमध्ये महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. विक्रोळी मतदारसंघ हा मनसेचा बालेकिल्ला



राहिला असून आजही शेकडो कार्यकर्ते या मतदारसंघात जनतेच्या कल्याणासाठी झटत असतात. कोविड काळात आपल्या जीवाची पर्वा न करता मनसे विभाग अध्यक्ष विश्वजित ढोलम यांनी अनेक नागरिकांना मुंबईत विविध हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध करून दिले तसेचतसेच वंचित घटकातील नागरिकांना जीवनाश्यक वस्तूंचे मोफत वाटप केले.

भांडुप, कांजूरमार्ग कन्नमवार नगर तसेच टागोर नगरची गेल्या १० वर्षात झालेली वाताहत आणि तेथील नागरिकांना येणाऱ्या समस्यांसाठी मनसेने नेहमीच आवाज उठविला आहे. आजही मराठी माणसावर अन्याय झाला तर एकच नाव आठवते ते म्हणजे सन्माननीय राजसाहेब ठाकरे.आज विक्रोळी मतदारसंघात अनेक मराठी कुटुंबीय अनेक वर्षापासून राहत आहेत परंतु त्यांना भेडसावणाऱ्या जीवघेण्या समस्या सोडविण्यासाठी कोणीही पुढे आलेले नाही त्यामुळे यावेळेला येथेही जनता मनसेच्या उमेदवाराला विधानसभेत पाठवतील असा आत्मविश्वास मनसेचे उमेदवार ढोलम यांनी व्यक्त केला.

## बोरिवलीतून गोपाळ शेट्टी यांनी भरला अपक्ष उमेदवारी अर्ज

प्रतिनिधी
■ मुंबई

"महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मुंबईत शिस्तीचा पक्ष म्हणून ओळख असलेल्या भाजपमध्ये ही कालच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बंडखोरी बघायला मिळाली. विशेष म्हणजे बोरिवली मतदार संघात पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनाही अपक्ष अर्ज भरावा लागला.

लोकसभेत सीटिंग मेंबर असलेल्या गोपाळ शेट्टी यांना डावलून बाहेरच्या पियूष गोयल यांना उत्तर मुंबई लोकसभा उमेदवारी देण्यात आली. गोपाळ शेट्टी यांच्यावर हा मोठा होता हा अन्याय सहन करून त्यांनी पियूष गोयल यांच्या सोबत फिरून प्रचार केला व गोयल यांना निवडून आणले. त्यावेळी त्यांनी इतर कुठल्याही पक्षात प्रवेश करून उमेदवारी मिळवली असती तर ते निवडूनही आले असते. इतके एकनिष्ठ राहिलेल्या गोपाळ शेट्टी यांना आता विधानसभा निवडणुकीतही डावलून बाहेरचा उमेदवार लादल्याने लोकांच्या आग्रहाखातर गोपाळ शेट्टी यांनी काल अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरायला गेले त्यावेळी भाजपा कार्यकर्ते आणि गोपाळ शेट्टी समर्थन आमनेसामने आल्याचे पाहायला मिळाले. अर्ज भरण्याच्या ठिकाणी भाजपाचेच कार्यकर्ते एकमेकांसमोर आल्याने तणाव निर्माण झाला होता.

स्थानिक उमेदवार न दिल्याने गोपाळ शेट्टी यांनी उघड नाराजी व्यक्त केली होती. तसेच अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरण्याचे निक्षून सांगितले होते. यानंतर भाजपा नेत्यांनी गोपाळ शेट्टी यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा काही उपयोग झाला नाही. बोरिवलीच्या सन्मानासाठी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूकीच्या रिंगणात उतरलो



आहे. बोरिवली ही काही धर्मशाळा नाही. बोरिवलीत नेहमी बाहेरचा उमेदवार दिला जातो. हा माझा व बोरिवलीकर मतदारांचा अपमान आहे. कोणालाही विश्वासात न घेता बोरीवलीतून उमेदवारी दिली जाते हे पक्षासाठी घातक आहे, अशी टीकाही गोपाळ शेट्टी यांनी केली. भाजपाने बोरीवलीत संजय उपाध्याय यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

भाजपाने अधिकृतपणे उमेदवारी जाहीर केल्यानंतर संजय उपाध्याय अर्ज दाखल करण्यासाठी काल दाखल झाले. यावेळी केंद्रीय मंत्री आणि स्थानिक खासदार पीयूष गोयल हेही उपस्थित होते. यावेळी गोपाळ शेट्टी यांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दादागिरी नहीं चलेगी, गोपाळ शेट्टी जिंदाबाद अशा घोषणा कार्यकर्त्यांकडून देण्यात आल्या. महायुतीकडून मोदी, मोदी अशा घोषणा देण्यात आल्या. गोपाळ शेट्टी यांचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. पोलिसांकडून दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना समजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र कार्यकर्ते ऐकायला तयार नव्हते. कार्यकर्त्यांचा आक्रोश पाहता केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनाही काढता पाय घ्यावा लागला.

**आम्ही ही निवडणूक जिंकू - खा. गोयल**

*महायुती संजय उपाध्याय यांच्यासोबत उभी आहे. आम्ही ही निवडणूक जिंकू, असा विश्वास पीयूष गोयल यांनी व्यक्त केला. दरम्यान, लोकसभा निवडणुकीला भाजपाने गोपाळ शेट्टी यांना डावलून पीयूष गोयल यांना उमेदवारी दिली. गोपाळ शेट्टी सुरुवातीला या निर्णयामुळे नाराज झाले होते. त्यांनी कार्यकर्त्यांची समजूत काढत आपली ताकद पीयूष गोयल यांच्या पाठी उभी केली आणि मोठ्या फरकाने ही जागा निवडून आणली. आता विधानसभेला बोरिवलीतून कोणाला उमेदवारी देण्यात येते, यावर राजकीय वर्तुळात चर्चा रंगली होती. सुनील राणे आणि गोपाळ शेट्टी या दोघांचा पत्ता कट करून भाजपाने थेट संजय उपाध्याय यांना उमेदवारी दिली. यावरून गोपाळ शेट्टी नाराज झाले आणि अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला. आता गोपाळ शेट्टी माघार घेतात का आणि गोपाळ शेट्टी आपल्या निर्णयावर ठाम राहिले, तर मतदारांचा कौल कोणाला मिळणार, गोपाळ शेट्टी बाजी मारून संजय उपाध्याय यांचा पराभव करतात की, मतदार महायुतीच्या बाजूने कौल देऊन विजयाचे दान संजय उपाध्याय यांच्या पारड्यात टाकतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरले आहे.*

## मराठवाडा भूषण पुरस्कारासाठी माहिती पाठवण्याचे आवाहन

### १० नोव्हेंबरपर्यंत मुदत

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठवाडा लोकविकास मंच मुंबई यांच्यातर्फे मराठवाडा भूषण व गौरव पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहे. एक मराठावाडा भूषण व पाच मराठावाडा गौरव असे सहा पुरस्कार देण्यात येतात. या प्रतिष्ठित पुरस्काराचे वितरण दरवर्षी राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याहस्ते केले जाते. रोख रक्कम, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

शिवसंग्रामचे प्रमुख विनायक मेटे यांच्या नेतृत्वाखाली संस्था स्थापन झालली असून विविध उपक्रम राबवले जात आहेत. विनायक मेटे यांच्यानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे काम सुरू आहे. दुष्काळामध्ये पाण्यासाठी "नाम" या संस्थेमार्फत विशेष मदत पुरवली, तसेच दुर्गम भागातील शाळेतील मुलांना शैक्षणिक सामग्री आणि शैक्षणिक शुल्क भरून मदत केली आहे. मुलींची संख्या वाढावी यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबवली गेली. तर बीड येथे दरवर्षी व्यसनमुक्ती कार्यक्रम घेऊन तरुणांना व्यसांमुक्तिकडे वळवण्यासाठी उपक्रम राबवत असते.

सामाजिक कार्याला वाहून घेणाऱ्या नामंकित जेष्ठ व्यक्तीला मराठावाडा भूषण पुरस्कार देण्यात येतो. तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मराठवाडा गौरव पुस्कार दिला जातो. त्यासाठी मराठवाडा लोकाविकास मंचचे सचिव राम जगदाळे (संपर्क क्रमांक ९८६९३८५८३४) यांच्याकडे दि. १० नोव्हेंबर २०२४ पर्यंत माहिती पाठवावी असे आवाहन संस्थेने केले आहे.

लोकविकास मंचतर्फे आतापर्यंत दिवंगत माजी केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, गंगा भीषण अग्रवाल, डॉक्टर तात्याराव लहाने अशा मराठवाड्यासाठी उल्लेखनीय काम केलेल्या नामांकित व्यक्तींना मराठवाडा भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

## मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्यासाठी दिव्यांग, जेष्ठ मतदारांसाठी गृह मतदानाची मुदत वाढवावी - रईस शेख

प्रतिनिधी
■ मुंबई

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्यातील विधानसभेच्या मतदानासाठी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना गृह मतदान करण्यासाठी नोंदणीची मुदत १० नोव्हेंबर पर्यंत करा, अशी मागणी समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार व उमेदवार रईस शेख यांनी केली आहे. महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांना त्या संदर्भात शेख यांनी शनिवारी पत्र लिहिले आहे. राज्यात मोठ्या संख्येने दिव्यांग आणि ज्येष्ठ मतदार आहेत. या गटातल्या मतदारांना गृह मतदानाची विशेष माहिती नाही. सध्या २७ ऑक्टोबर हा गृह मतदानासाठी नोंदणीचा शेवटचा दिनांक आहे. जर ही नोंदणीची मुदत वाढवली तर राज्यातील मतदानाचा टक्का नक्की वाढणार आहे.

राज्यात ६ लाख ३६ हजार २७८ दिव्यांग मतदार असून १२ लाख ४३ हजार १९२ ज्येष्ठ मतदार आहेत. ज्यांना ४० टक्के दिव्यांगत्व आहे, ते दिव्यांग आणि ८५ आणि त्यापुढचे वयाचे जेष्ठ मतदार या गटात येतात. यांना गृह मतदान करण्याची परवानगी आहे. पण, त्यासाठी नोंदणी करावी लागते.

गृह मतदान करण्यासाठीच्या नोंदणीबाबत या गटातील मतदारांना विशेष माहिती नाही. याची अधिक जाहिरात होणे आवश्यक आहे. त्यामुळे १० नोव्हेंबर पर्यंत नोंदणी करण्याची मुदत वाढवावी. मुदत वाढवल्यास मतदानाचा राज्यातील टक्का वधारेल, असा दावा आमदार रईस शेख यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त आणि राज्याचे निवडणूक मुख्याधिकारी यांना पाठवलेल्या पत्रामध्ये केला आहे.

राज्यात एक लाख १८६ मतदान केंद्रे असून २० नोव्हेंबर रोजी ३६ जिल्ह्यात एकाच टप्प्यात विधानसभेसाठी २८८ मतदारसंघात आणि नांदेड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीचे मतदान होणार आहे. शहरांमध्ये ४२ हजार ६०४ तर ग्रामीण भागात ५७ हजार ५८२ मतदान केंद्र आहेत



*मुंबई : शिवसेना + भाजपा + राष्ट्रवादी काँग्रेस + रिपाई व मित्रपक्ष महायुतीचे १५९- दिंडोशी विधानसभेचे अधिकृत लोकप्रिय उमेदवार संजय निरुपम यांनी भव्य नामांकन रॅली काढत उमेदवारी अर्ज दाखल केला. या नामांकन रॅलीमध्ये अलोट गर्दी पाहायला मिळाली. याप्रसंगी महायुतीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

## एमएमआरडीएच्या धोकादायक इमारतीतील रहिवाशांचा ठाण्यामध्ये जाण्यास विरोध

प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगाव पश्चिम येथील एम एमएमआरडीएची पी 5 ही इमारत धोकादायक स्थितीत असून सदर इमारतीतील काही रहिवाशांना ठाणे येथे स्थलांतर करण्याचा निर्णय एमएमआरडीएने घेतला आहे. या निर्णयाला इमारतीतील रहिवाशांनी विरोध केला असून कुठल्याही परिस्थितीत आम्ही ठाणे येथे जाणार नाही, असा निर्धारच त्यांनी व्यक्त केला आहे.

ग्रीन पार्क सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एमएमआरडीएने दोस्ती इंटरप्रायझेस बाळकुम, ठाणे या ठिकाणी तात्पुरते स्थलांतर करण्यासाठी निश्चित केले आहे. त्या ठिकाणी जाण्यासाठी आमची उर्वरित लोक तयार नाहीत. कारण त्यांच्या अनेक अडचणी आहेत. ते सर्व लोक गरीब आहेत. त्यांचे हातावर पोट आहे. काम धंदा मुलांच्या शाळा महिला घरकामे करुन आपल्या मुलाबाळांचा उदरनिर्वाह करत आहे. त्यामुळे इतक्या लांब जाणे त्यांना मंजूर नाही. आम्हाला कायद्यानुसार तीन किलोमीटर अंतरावर घरे देण्याचे निश्चित केलेले आहे. सिग्मा आर हया इमारतीमध्ये आमच्या उर्वरित लोकांना घरे देण्याऐवजी एम.एम.आर.डी.ए. यांनी ठाण्याच्या लोकांना राममंदिर सिग्मा आर-१ मध्ये देत आहोत. हा आमच्यावर अन्याय होत असून हे चुकिचे आहे. आमची लोक दोस्ती इंटरप्राईझेस बाळकुम ठाणे तात्पुरते तर नाहीच. कायमस्वरूपी स्थलांतर होण्यासाठी तयार नाहीत. आमच्या लोकांना सिग्मा ही इमारत जवळ असून आमच्या लोकांना सोयीस्कर आहेत. त्यामुळे आमच्या लोकांना सिग्मा या ठिकाणी तात्पुरते उर्वरीत स्थलांतर करण्यात यावे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

## दिवाळीला रामलल्ला सोन्या-चांदीच्या पितांबरी वस्त्रांमध्ये सजणार

**अयोध्या:** अयोध्येत बालक राम म्हणजेच भगवान रामलल्ला यांची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर ही पहिलीच दिवाळी आहे. 500 वर्षांनंतर येणाऱ्या या क्षणाचा आनंद अयोध्येत गेल्या 3 दिवसांपासून पाहायला मिळत आहे, मात्र पहिल्या दिवाळीला रामलल्ला काय परिधान करणार हे जाणून घेण्याची भक्तांमध्ये उत्सुकता आहे. हा प्रश्न आम्ही डिझायनर मनीष मल्होत्रा यांना विचारला. मनीष तीच व्यक्ती आहेत ज्यांचे डिझाइन केलेले वस्त्र रामलल्ला प्राणप्रतिष्ठापासून परिधान करत आहेत. धनत्रयोदशीच्या पोशाखात सोमवारी सकाळी दिल्लीहून विमानाने अयोध्येला पोहोचल्याचे त्यांनी दिव्य मराठीला सांगितले. श्रीरामाचे वस्त्र त्यांनी श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टकडे सुपूर्द केले आहेत. 30 दिवसांत 15 साधकांनी धनत्रयोदशीची वेशभूषा तयार केली मनीष यांनी सांगितले- धनत्रयोदशीचा ड्रेस गुजराती बंधेज पॅटर्नवर बनवला आहे. कापड गव्हाळ लाल रंगाचे आहे. चांदीच्या तारेचे स्टिचिंग आणि एम्ब्रॉयडरी करण्यात आली आहे. यात चांदीच्या ताराचे 8 रोल आहेत. 15 श्रमिक साधकांनी 30 दिवसांत ते तयार केले आहे.





### निवडणूक म्हणजे 'संगीत खुर्ची' आहे का?

पान 1 वरुन.

पाच वर्ष एखाद्या व्यक्तीने मतदारसंघात काम केल्यानंतर दुसऱ्याच कुणाला तरी तिकीट दिले जाते. हा काय संगीत खुर्चीचा खेळ आहे का? कुणालाही मतदारसंघावर थोपणे योग्य आहे का? 50 हजार लोकांचे लसीकरण केले. 'लाडकी बहीण' योजनेसाठी मी तंबू लावून 12 हजार अर्ज भरून घेतले, मी तन-मन-धन अर्पून 24 तास पक्षासाठी काम केले. त्यानंतरही जर मला उमेदवारी नाकारली जात असेल तर मनाला वेदना होणारच. नेतृत्वाची चूक झाली आहे, त्यांनी आपली चूक सुधारावी. जशी आमच्याकडून चूक होते, तशी नेतृत्वाकडूनही चूक होऊ शकते, असेही आवाहन अतुल शाह यांनी केले.

# गाझियाबादच्या न्यायालयात न्यायाधीश आणि वकील भिडले

## पोलिसांना कोर्टरूममध्येच वकिलांवर लाठीमार

**वृत्तसंस्था**
**गाझियाबाद**

साधारणपणे न्यायदानाच्या प्रक्रियेला पवित्र मानून न्यायाधीशाच्या पदावर बसलेल्या व्यक्तीच्या शब्दाला मान दिला जातो. मात्र, गाझियाबाद येथील एका न्यायालयात वकिलांचा न्यायाधीशाबरोबर जोरदार वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की न्यायाधीशांना सुरक्षितपणे बाहेर नेण्यासाठी पोलिसांना कोर्टरूममध्येच वकिलांवर लाठीमार करावा लागला. पोलिसांच्या या लाठीचार्जमध्ये कोर्ट रूममधील अनेक वकील जखमी झाले.

गाझियाबादमधील बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्याशी संबंधित एक प्रकरण घेऊन काही वकिलांनी जिल्हा न्यायाधीशांसमोर गेले होते. या प्रकरणावरील सुनावणीदरम्यान वकिलांनी जिल्हा न्यायाधीशांशी गैरवर्तन





केले. त्यामुळे न्यायाधीशांनी न्यायालयाच्या आवारात तैनात असलेल्या पोलिसांना पाचारण केले. त्यानुसार पोलीस आले आणि त्यांनी कोर्ट रूममध्येच वकिलांवर लाठीचार्ज केला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात पोलीस कोर्ट रूममध्ये वकिलांवर लाठीमार करत असल्याचे दिसते.

पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमुळे वकील खूप संतापले आहेत. तर दुसरीकडे जिल्हा न्यायाधीशांनीही कोर्ट रूमवर बहिष्कार टाकला आहे. या घटनेनंतर बार असोसिएशनने वकिलांची बैठक बोलावून त्यात भविष्यातील रणनीतीवर वकील चर्चा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. पोलिसांने केलेल्या लाठीचार्जच्या कारवाईमुळे संतप्त झालेल्या वकिलांनी न्यायालयाच्या आवारातील पोलीस चौकीची तोडफोड करून पेटवून दिल्याचे वृत्त आहे. तसेच, वकिलांनी कोर्ट रूमबाहेर धरणे आंदोलन करत घोषणाबाजी केली. या तणावामुळे संपूर्ण परिसराचे पोलीस छावणीत रुपांतर झाले आहे.

## दिल्लीत ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश!

# तब्बल ९५ किलो ड्रग्ज जप्त, तिहार जेल वॉर्डनचाही समावेश



**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

दिल्ली पोलिसांनी दिल्लीमधील ग्रेटर नोएडामध्ये छापेमारी करत ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी केलेल्या छापेमारीत तब्बल ९५ किलो ड्रग्ज आढळून आलं आहे. हे ड्रग्ज जप्त करत पोलिसांकडून तीन जणांना अटक करण्यात आलं आहे. दिल्लीमधील एक व्यापारी आणि मुंबईतील एका केमिस्टद्वारे हे ड्रग्ज रॅकेट चालवलं जात होतं, अशी माहिती या कारवाईनंतर समोर आली आहे.

तसेच या ड्रग्ज रॅकेटमध्ये तिहार जेलच्या वॉर्डनचाही सहभाग असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यानंतर दिल्ली पोलिसांनी वॉर्डनला अटक केली असून पुढील तपास करण्यात येत आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांना या ड्रग्ज रॅकेटसंदर्भात माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलिसांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली. या कारवाईत तब्बल कोट्यवधींचं ९५ किलो ड्रग्ज जप्त केलं.

दरम्यान, या ड्रग्ज रॅकेटमध्ये आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे? हे ड्रग्ज कोठे विकले जात होते? या संपूर्ण प्रकरणात तिहार जेलचा वॉर्डनचा कसा सहभाग होता? त्याच्यासह आणखी कोण आणि कोठून सहभागी होते? ड्रग्ज कशा प्रकारे तयार केले जात होते? अशा प्रकारची चौकशी आता पोलिसांकडून केली जाणार आहे. या संदर्भातीलवृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. २५ ऑक्टोबर रोजी नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB) आणि दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने गौतम बुद्ध नगर येथील एका लॅबवर छापा टाकला होता. या कारवाईत कोट्यवधींचे ९५ किलो ड्रग्ज आणि ड्रग्ज तयार करण्यासाठी लागणारे काही साहित्य पोलिसांनी जप्त करण्यात आलेलं आहे.

पान ९ वरुन

### आर. आर. आबांनी केसाने गळा कापला

ती फाईल सही करण्यासाठी गृह विभागाकडे गेली. त्यावर आर. आर. पाटील यांनी सही देखील केली. त्या नंतर ही फाईल मुख्यमंत्र्यांकडे गेली. मात्र, पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यावर सही केली नाही. त्याच वेळी आम्ही सरकारचा पाठिंबा काढला आणि सरकार पडून राष्ट्रपती राजवट लागू झाली. त्यानंतरच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले. देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर सही केली आणि मला बोलवून आर. आर. पाटील यांनी सही केल्याचे दाखवले, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. आर. आर. पाटील यांनी या चौकशीच्या फाईलवर सही केली, हे मला कळल्यानंतर मला अत्यंत वाईट वाटले. आपला जिवाभावाचा सहकारी असून देखील त्यांनी तसे केले. आपले काहीतरी चुकले असेल, म्हणूनच त्यांनी अशी सही केली असेल. असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्या या विधानामुळे आता राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले आहे.

### काँग्रेसने तिकीट दिलं, पण एबी फॉर्मच दिला नाही

जाहीर केली. पण, त्यांना एबी फॉर्म पक्षाकडून दिला गेला नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. प्रणिती शिंदे आणि काँग्रेसने दगाफटका केल्याचा आरोप माने समर्थकांनी केला. एबी फॉर्मच्या प्रतिक्षेत असलेल्या दिलीप माने यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला, तर त्यांचा मुलगा पृथ्वीराज माने यांनी पूरक म्हणून अपक्ष अर्ज दाखल केला आहे. दिलीप माने म्हणाले, "मला शेवटच्या क्षणापर्यंत वाट बघण्यासाठी सांगण्यात आलं होतं. ऐनवेळी मला एबी फॉर्म दिला नाही. एबी फॉर्म होता, पण माझ्यापर्यंत पोहोचवला नाही. मी आता अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला. कार्यकर्त्यांना विचारून अर्ज ठेवण्याबाबत निर्णय घेईन", असे दिलीप माने यांनी सांगितले.

### पोलीस भाजपच्या राजकीय कामाला जुंपलेत


बदली करावी अशी आमची मागणो होती. कारण पोलीस यंत्रणा एका पक्षाच्या राजकीय कामाला जुंपली आहे. त्यामुळे निवडणुका स्वच्छ वातावरणात होणार नाही हा आमचा अंदाज हळूहळू खरा ठरताना दिसतोय, असेही राऊत म्हणाले. अद्वय हिरे सुदैवाने बचावले. त्यांच्यावर बंदुक रोखण्यात आली होती, पण कार्यकर्त्यांनी दादा भुसेंच्या मारेकऱ्याला खेचल्यामुळे ते बचावले. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची ही परिस्थिती असताना गृहमंत्री देवेंद्र फडणवीस रोज कुठे ना कुठे जिपवर बसून मिरवणुकीत सामील झालेले दिसतात. तिकडे अमित शहा महाराष्ट्रात आम्ही कसे जिंकणार याचे अंदाज देताहेत. अशा पद्धतीने निवडणुका लढवल्या जाणार आहेत का? असा सवाल करत राऊत यांनी ज्याच्या पोलीस महासंचालिका रश्मी शुक्ला यांची बदली करण्याची आणि गुंडागर्दी, झुंडशाहीविरोधात कठोर कारवाईचे निर्देश द्यावेत, अशी मागणी राऊत यांनी देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना केली.

# केरळच्या मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील 5 गाड्या एकमेकांना धडकल्या

**वृत्तसंस्था**
**गाझियाबाद**

केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांचा सोमवारी संध्याकाळी अपघात झाला. विजयन कोट्टायमहून तिरुअनंतपुरमला परतत होते. सायंकाळी 5.45 च्या सुमारास वामनपुरम पार्क जंक्शन येथे मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याच्या पुढे जात असताना अचानक एक स्कूटर चालवणारी महिला कारसमोर आली.

महिलेने स्कूटर अचानक वळवल्यामुळे मागून येणाऱ्या गाड्यांनी ब्रेक लावला, त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील सर्व गाड्या एकमेकांवर आदळल्या. अपघातानंतर मुख्यमंत्र्यांच्या



सुरक्षेसाठी तैनात असलेले जवान आपापल्या कारमधून ताफ्यातून खाली उतरले. त्यांनी तातडीने परिस्थितीचा आढावा घेतला. मात्र, या अपघातात कोणीही जखमी झाले नाही. ही संपूर्ण घटना जवळच असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली.

स्कूटी अचानक वळल्याने पाठीमागून येणाऱ्या दोन गाड्यांनी अचानक ब्रेक लावला, त्यानंतर ताफ्यातील वाहनांनाही अचानक ब्रेक लावून थांबावे लागले. स्कूटी अचानक वळल्याने पाठीमागून येणाऱ्या दोन गाड्यांनी अचानक ब्रेक लावला, त्यानंतर ताफ्यातील वाहनांनाही अचानक ब्रेक लावून थांबावे लागले.

स्कूटी गेल्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यासमोरील कार गेली, मात्र ताफ्यातील सर्व गाड्या एकमेकांवर आदळल्या. अपघातानंतर मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या गाडीकडे धावले. वैद्यकीय कर्मचारीही रुग्णवाहिकेतून बाहेर आले आणि मुख्यमंत्र्यांच्या गाडीजवळ पोहोचले. अपघातानंतर मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेसाठी तैनात असलेले अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या गाडीकडे धावले. वैद्यकीय कर्मचारीही रुग्णवाहिकेतून बाहेर आले आणि मुख्यमंत्र्यांच्या गाडीजवळ पोहोचले.

## मुलींना भरधाव कारने चिरडले, अल्पवयीन ताब्यात

**वृत्तसंस्था**
**इंदूर**

देशभरात दिवाळीच्या सणाला उत्साहात सुरुवात होत असतानामध्य प्रदेशमधील इंदूर शहरामध्ये हिट अँड रनची एक धक्कादायक घटना घडली आहे. येथे आपल्या घराबाहेर अंगणात रांगोळी काढत असलेल्या मुलींना भरधाव कारने चिरडले.

**अल्पवयीन ताब्यात**

त्यामध्ये एक मुलगी गंभीर जखमी झाली आहे. तिला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर या प्रकरणी १७ वर्षीय आरोपीला ताब्यात घेण्यात आलं आहे.

ही घटना सोमवारी संध्याकाळी घडली. या पीडितांची ओळख प्रियांशी प्रजापती (२१) आणि नव्या प्रजापती (१४) यांच्या रूपात पटवण्यात आली आहे. त्या दोघीही एरोड्रोम पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या त्यांच्या घराबाहेरील अंगणात रांगोळी काढत होत्या तेवढ्यात आलेल्या एका भरधाव कारने त्यांना चिरडले.

## सहारनपूरमध्ये मुलीवर गँगरेप, तिसऱ्या मजल्यावरून फेकले

**वृत्तसंस्था**
**सहारनपूर**

सहारनपूरमध्ये मुस्लिम तरुणांनी एका हिंदू मुलीवर सामूहिक बलात्कार केला. आधी त्यांनी तरुणीच्या लहान भावाचे अपहरण केले. यानंतर मुलीला बोलावण्यात आले. त्यांनी त्याला बंधक बनवून तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिसऱ्या मजल्यावरून



खाली फेकले. यामुळे मुलीचा पाय मोडला.पीडितेने सोमवारी आईसोबत एसएसपी कार्यालय गाठले. रडत रडत तिने सगळा प्रकार सांगितला. एसएसपी रोहित सिंह सजवान यांनी या प्रकरणाची चौकशी करून आरोपींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. पीडितेने एसएसपींना अर्ज दिला. ती मेळ्यांमध्ये जादूगार आणि डान्स पार्ट्यांमध्ये नर्तक म्हणून काम करते, असे सांगण्यात आले. चार तरुण मेळ्यांमध्येही सादरीकरण करतात. हे सर्वजण शामली येथील झिंझाना येथील रहिवासी आहेत.

## बसचा भीषण अपघात,10 प्रवाशांचा मृत्यू , 20 गंभीर

**वृत्तसंस्था**
**जयपूर**

राजस्थानच्या सीकरमध्ये आज दुपारी भीषण अपघात झाला आहे.सीकर जिल्ह्याच्या लक्ष्मण गढ परिसरात प्रवाशांनी भरलेली एक प्रायव्हेट बस पुलावर अनियंत्रित झाली आणि त्यानंतर ती पुलाच्या भिंतीवर जाऊन आदळली. या घटनेत बसचा चक्काचूर झाला असून, या बसमधील दहा प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तर वीस प्रवासी गंभीर जखमी





झाले आहेत. जखमी प्रवाशांना उपचारासाठी स्थानिकांच्या मदतीनं तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या बसमध्ये एकूण चाळीस प्रवासी होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीनं घटनास्थळी धाव घेतली.

या अपघाताचं नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नाही, मात्र बस अनियंत्रित होऊन हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं. सीकर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दुपारी दोनच्या सुमारास हा अपघात झाला आहे. प्रत्यक्षदर्शीने या अपघाताबाबत बोलताना सांगितलं की, बर प्रचंड वेगात होती, अचानक अनियंत्रित झाली आणि पुलाच्या भिंतीला जाऊन धडकली. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. या अपघातामध्ये दाहा प्रवाशांचा मृत्यू झाला आहे, तर वीस प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. जखमी प्रवाशांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे,

## अखनूरमध्ये 27 तासांनंतर चकमक संपली
## K-9 पथकाचा डॉग फँटम शहीद

**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

जम्मू-काश्मीरच्या अखनूरमध्ये सोमवारी सुरू झालेली चकमक तब्बल 27 तासांनंतर मंगळवारी रात्री 10 वाजता संपली. सुरक्षा दलांनी (LoC) जवळील भट्टल भागातील जंगलात ३ दहशतवाद्यांचा खात्मा केला. काल एका दहशतवाद्याचा मृतदेह सापडला होता, आज आणखी 2 दहशतवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. या दहशतवाद्यांनी सोमवारी सकाळी ७.२६ वाजता लष्कराच्या रुग्णवाहिकेवर हल्ला केला. यामध्ये कोणतीही जीवित वा वित्तहानी झाली नाही. हल्ल्यानंतर दहशतवादी जंगलाच्या दिशेने पळून गेले होते, त्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम राबवली आणि सुमारे 5 तासांच्या प्रयत्नानंतर 3 दहशतवाद्यांना ठार करण्यात आले.

## 60 विमानांना पुन्हा बॉम्बची धमकी

# एअर इंडियाच्या दिल्ली-कोलंबो विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

देशातील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर बॉम्बच्या धमक्या सलग 15व्या दिवशीही कायम आहेत. सोमवारी इंडियन एअरलाइन्सच्या 60 हून अधिक विमानांना बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्या.

धोक्यामुळे एअर इंडियाच्या दिल्ली-कोलंबो एआय 281 फ्लाइटचे कोलंबो आंतरराष्ट्रीय विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. विमानात 108 प्रवासी आणि 8 कर्मचारी होते. फ्लाइटची तपासणी करण्यात आली, पण ही बातमी खोटी निघाली.

गेल्या 15 दिवसांत 400 हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. सर्व बनावट असल्याच्या आढळून आले. आज मिळालेल्या धमक्यांमध्ये एअर इंडिया-इंडिगोच्या प्रत्येकी 21 आणि विस्ताराच्या 20 फ्लाइटचा समावेश आहे.

एअर इंडियाच्या प्रवक्त्याने सांगितले की, सोशल मीडियाच्या माध्यमातून बॉम्बची धमकी देण्यात आली होती. यानंतर विहित प्रोटोकॉलचे पालन करण्यात आले आणि सुरक्षेची पावले उचलण्यात आली.

# अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन यांनी व्हाईट हाऊसमध्ये साजरी केली दिवाळी

- जॉर्ज बुश यांनी 21 वर्षांपूर्वी सुरुवात केली
- सुनीता विल्यम्स यांच्या अवकाशातून शुभेच्छा

**वृत्तसंस्था**
**वॉशिंग्टन**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी सोमवारी रात्री व्हाईट हाऊसमध्ये दिवाळी साजरी केली. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, यात 600 हून अधिक भारतीय-अमेरिकन सहभागी झाले होते. भारतीय-अमेरिकन खासदार, अधिकारी आणि व्यावसायिक नेत्यांना संबोधित करताना, बायडेन म्हणाले की व्हाईट हाऊसमध्ये दिवाळीचा सर्वात मोठा कार्यक्रम आयोजित करणे हा त्यांच्यासाठी सन्मान आहे.

बायडेन म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सिनेटर या त्यांच्या कार्यकाळात त्यांनी मोठ्या संख्येने भारतीय-अमेरिकन लोकांसोबत काम केले आहे. बायडेन म्हणाले की, दक्षिण-आशियाई अमेरिकन समुदायाने अमेरिकन जीवनाचा प्रत्येक



भाग समृद्ध केला आहे. हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा समुदाय आहे. आता दिवाळी व्हाईट हाऊसमध्ये अभिमानाने साजरी केली जाते.

मात्र, यावेळी उपाध्यक्ष कमला हॅरिस आणि फर्स्ट लेडी जिल बायडेन या दिवाळी सोहळ्याला उपस्थित राहू शकल्या नाहीत. बायडेन म्हणाले की, जिल आणि कमला यांना येथे यायचे होते, पण त्या प्रचारात व्यस्त आहेत.

त्याचवेळी सुनीता विल्यम्स यांनी अंतराळातील आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून व्हिडिओ संदेशाद्वारे दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. संदेशात सुनीता म्हणाल्या, या वर्षी मला पृथ्वीपासून ४०० किमी वर अंतराळ स्थानकावर दिवाळी साजरी करण्याची अनोखी संधी मिळाली आहे. माझ्या वडिलांनी आम्हाला नेहमी दिवाळी आणि इतर भारतीय सणांची शिकवण दिली आणि आम्हाला आमच्या सांस्कृतिक मुळाशी जोडून ठेवले. दिवाळी हा आनंदाचा क्षण आहे कारण जगात चांगुलपणाचा प्रसार होतो.

जॉर्ज बुश यांच्या काळात व्हाईट हाऊसमध्ये दिवाळी सुरू झाली एएनआयच्या वृत्तानुसार, अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या कार्यकाळात 2003 मध्ये व्हाईट हाऊसमध्ये दिवाळी साजरी करण्याची परंपरा पहिल्यांदा सुरू झाली होती. तथापि, ते कधीही वैयक्तिकरित्या गुंतले नाही. 2009 मध्ये बराक ओबामा यांनी राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर व्हाईट हाऊसमध्ये एकांतात दिवाळी साजरी केली होती.

# गाझामधील लोकांच्या समस्या आणखी वाढणार

## इस्त्रायलची UN एजन्सीला येथे मदत करण्यावर बंदी, 3 महिन्यांत काम थांबवावे लागेल

**वृत्तसंस्था**
**तेल अवीव**

युनायटेड नेशन्स एजन्सी (UNRWA) वर बंदी घालण्यासाठी इस्त्रायलच्या संसदेत (नेसेट) मतदान झाले आहे. एजन्सीला इस्त्रायलच्या भूमीवर काम करण्यापासून रोखण्याची तरतूद या कायद्यात आहे. बीबीसीच्या म्हणण्यानुसार, हा कायदा 92-10 मध्ये पास झाला होता.

कायद्यानुसार गाझा, वेस्ट बँक आणि इस्त्रायलच्या इतर भागातील लोकांना मदत करणाऱ्या UNRWA ला ३ महिन्यांच्या आत काम थांबवावे लागेल. UNRWA गाझामधील लाखो पॅलेस्टिनी निर्वासितांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि इतर मूलभूत गरजा



पुरवते, ज्यात इस्त्रायली-व्याप्त वेस्ट बँक समाविष्ट आहे. ही एजन्सी गाझा आणि वेस्ट बँकमधील 25 लाख लोकांना मदत करत आहे.

हा कायदा मंजूर झाल्यामुळे गाझामध्ये मानवतावादी संकट वाढण्याची शक्यता वाढते, कारण आधीच अन्न, पाणी आणि औषधांचा तुटवडा आहे.

UNRWA ला दहशतवादी गट घोषित करण्यात आले सोमवारी नेसेटमध्ये दुसऱ्या विधेयकावर मतदान झाले. यामध्ये UNRWA ला दहशतवादी संघटना घोषित करण्यात आले होते आणि इस्त्रायली अधिकाऱ्यांना या संयुक्त राष्ट्र संघटनेशी कोणत्याही प्रकारचा संपर्क ठेवण्यास बंदी घालण्यात आली होती. हा कायदा 87-9 मध्ये पास झाला.

पूर्वी UNRWA पॅलेस्टाईन सोडून इतर देशांमध्ये स्थायिक झालेल्या लोकांना मदत करत असे. इस्त्रायल आणि संयुक्त राष्ट्र यांच्यात १९६७ साली एक करार झाला. यामध्ये UNRWA ला इस्त्रायलच्या ताब्यातील भागात पॅलेस्टिनी निर्वासितांना मदत करण्याची परवानगीही देण्यात आली होती. हा करार आता इस्त्रायलच्या संसदेत झालेल्या मतदानाने रद्द करण्यात आला आहे. इस्त्रायल म्हणाला, UNRWA हमासशी संबंधित इस्त्रायलचा आरोप आहे की UNRWA कर्मचारी हमाससोबत जवळून काम करत आहेत आणि 7 ऑक्टोबर 2023 रोजी इस्त्रायलवर झालेल्या हल्ल्यात एजन्सीच्या 19 कर्मचाऱ्यांनी भाग घेतला होता.